७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०७ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# उमेदवार देण्याचा काँग्रेसला अधिकार : पवार

## पार्थ पवारांच्या राजकीय परिपक्वतेवरही भाष्य : राष्ट्रवादीच्या बॅनरवर माझा फोटो वापरणे चुकीचे

**मुंबई (दै. संध्या)**



"काँग्रेस हा एक मोठा आणि स्वतंत्र राजकीय पक्ष आहे. निवडणूक लढवण्याबाबत निर्णय घेणे हा त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक निवडणुकीत कुणीतरी विरोधात लढणारच, हे गृहीत धरूनच रिंगणात उतरावे लागते. त्यामुळे बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध न होण्याबाबत अधिक चर्चा करण्याची गरज नाही," असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे.

शरद पवार यांनी आज राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली. यानंतर दिल्लीत ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी बारामती पोटनिवडणूक, अशोक खरात प्रकरण, पार्थ पवार यांसह विविध मुद्द्यावर भाष्य केले.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेबाबत बोलताना शरद पवार भावूक झाले. ते म्हणाले, "अजितदादांच्या जाण्याने आमच्या संपूर्ण कुटुंबाला मोठे दुःख झाले आहे. ते लोकांसाठी अत्यंत सक्रिय होते आणि विकासकामांत त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्याबद्दल मनात आदर आहे, हे मान्यच करावे लागेल. सध्या पवार कुटुंबात 'कुटुंबप्रमुख' म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही बारामतीची ही पोटनिवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आम्ही या निवडणुकीत कोणाचाही प्रचार करणार नाही." उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी आयोजित केलेल्या सभेत पक्षाच्या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह शरद पवार यांचाही फोटो होता. याबाबत शरद पवार यांना विचारले असता, त्यांच्या पक्षाच्या बॅनरवर एनडीएच्या नेत्यांचे फोटो असण्यात काही अडचण नाही. कारण ते एनडीएमध्ये आहेत. पण राष्ट्रवादीच्या बॅनरवर माझा फोटो वापरणे चुकीचे आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चेवरही शरद पवार यांनी पडदा टाकला. "विलीनीकरणाची चर्चा ही जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यामध्ये सुरू होती. मात्र, सध्या आमच्या पक्षात विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा सुरू नाही. अजितदादांसोबत या संदर्भात पाच-सहा बैठका झाल्या. बैठक झाल्यावर दोघांपैकी एक येऊन मला ब्रिफिंग करायचे. भविष्यात ही प्रक्रिया पुढे होऊ शकते की नाही आज ते सांगता येत नाही. अजित पवारांचा दृष्टिकोण आणि आग्रह हा आमच्या लोकांना समाधान देणारा होता. ते गेल्यामुळे ते कंटिन्यू राहिलं नाही. त्यामुळे आता पक्षाचं काम करत राहावं अशीच भूमिका आहे." असे ते म्हणाले.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. यावर भाष्य करताना पवार म्हणाले की, "महाविकास आघाडीतील घटकपक्ष म्हणून काँग्रेसला माघार घेण्याबाबत सांगण्याची आम्हाला गरज वाटत नाही. राजकारणात पराभव झाला तरी लोक लोकांची कामे करण्यासाठीच मैदानात उतरत असतात.

### खरात प्रकरणावर टिप्पणी

राज्यात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणावर बोलताना, शरद पवार म्हणाले, "आज राज्यात चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे. एका बाजूला शाहू, फुले, आंबेडकर म्हणायचं आणि दुसरीकडे अशा पद्धतीने लोकप्रतिनिधी जातात हे चिंताजनक आहेत. कोणी किती फोन केले हे माझ्या वाचनात आलं, त्यात अनेकांची नावं आहेत. त्यात राजकीय पक्षात स्थान भुषवणारे लोक आहेत."

# बारामती पोटनिवडणूक : सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज दाखल



**मुंबई (दै. संध्या)**

■ ऐतिहासिक मताधिक्याने विजय होणार, NCP, भाजप, शिवसेनेचा ठाम विश्वास

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे.

आज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटच्या दिवशी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महायुतीकडून ही निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण काँग्रेसने याठिकाणी आकाश विश्वनाथ मोरे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनीही आज आपला अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी होणार की काँग्रेस त्यात रंगत भरणार हे 23 एप्रिलला स्पष्ट होणार आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




# मुंबईच्या गोरेगावात दोन गटांत राडा

## पोलिसांनी आरोपींच्या घरावर चालवला बुलडोझर

**मुंबई (दै. संध्या)**




गोरेगावच्या दिंडोशी परिसरात रविवारी रात्री दोन गटांत तुफान राडा झाला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असताना पोलिसांनी आज सकाळी चोख बंदोबस्त या घटनेतील आरोपींच्या घरांवर बुलडोझर चालवून आपला खाक्या दाखवला. दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या घटनास्थळी जाऊन हनुमान चालीसा म्हणणार आहेत. त्यामुळे या प्रकरणी योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, गोरेगावच्या दिंडोशी येथील संतोष नगर मार्केट परिसरात रविवारी रात्री मरियम माता शोभा यात्रा निघाली होती. त्यावेळी तेथील दोन गटांत वाद झाला. त्यात बजरंग दलाचे 3 कार्यकर्ते जखमी झाले. तर अनेक जण जखमी झाले. जखमींना जोगेश्वरीच्या ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर आरोपींची ओळख पटवून 8 जणांना अटक केली. यावेळी जमावाला पांगवण्यासाठी त्यांनी सौम्य बळाचाही वापर केला. या घटनेनंतर संतोष नगर परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामुळे या भागाला पोलिस छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. सध्या येथे तणावपूर्ण शांतता आहे. पोलिस स्थितीवर लक्ष ठेवून आहेत. दुसरीकडे, संतोष नगर परिसरातील अनधिकृत बांधकामाबाबत पोलिसांकडे यापूर्वीच अनेक तक्रारी आल्या होत्या. कालच्या राड्यानंतर पोलिसांनी या तक्रारींची शहानिशा केली. त्यात या घटनेतील आरोपींची घरे अनधिकृत असल्याची बाब स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी आज सकाळी महापालिकेच्या मदतीने त्यांच्या घरावर बुलडोझर चालवला. यामुळेही येथील तणावात अधिकची भर पडली. दुसरीकडे, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज सायंकाळी घटनास्थळी हनुमान चालीसा पठण करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

# अखेर भोंदू अशोक खरातवर मनी लाँड्रिंगचा गुन्हा

## ED खरातच्या आर्थिक साम्राज्याच्या मुळाशी जाणार; महत्त्वाचे दस्तऐवज घेतले ताब्यात

**नाशिक (दै. संध्या)**



अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी भोंदू अशोक खरात विरोधात आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला. यामुळे खरातवर दाखल असणाऱ्या गुन्ह्यांची संख्या 13 वर पोहोचली आहे. या गुन्ह्यामुळे भोंदू खरातचा पाय आणखी खोलात गेला आहे. भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी त्याच्याविरोधात आतापर्यंत 12 गुन्हे दाखल झालेत. यापैकी 8 गुन्हे हे महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक व जादूटोणा केल्याशी संबंधित आहेत. तर इतर 4 गुन्हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. त्यात आता ईडीने दाखल केलेल्या मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्याची भर पडली आहे. ईडीने प्रस्तुत प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर हा गुन्हा (ECIR) दाखल केला आहे. त्यानुसार, पोलिसांनी जमा केलेली सर्व महत्त्वाचे दस्तऐवज ईडीने आपल्या ताब्यात घेतले आहेत. अशोक खरातचे आर्थिक साम्राज्य नेमके कसे उभे राहिले? याचा तपास आता ईडी करत आहे.

ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू केल्याचीही माहिती आहे. या प्रकरणी अशोक खरातच्या बेहिशोबी मालमत्तांसह त्याच्या बँक खात्यांची माहिती घेतली जात आहे. या तपासानंतर खरातच्या मालमत्तांवर टाच येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशोक खरात व त्याची पत्नी कल्पना खरात यांच्यासह 5 जणांविरोधात शिर्डीत बेकायदा सावकारकी व जमीन व्यवहारात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे अशोक खरातच्या आर्थिक व्यवहारासह मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहारही तपास यंत्रणांच्या रडारवर आले आहेत. या प्रकरणी विशेष तपास पथकाने शिर्डी नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व माजी नगरसेवकांना चौकशीसाठी समन्स बजावला आहे. साई संस्थानचा एक माजी विश्वस्तही यासंबंधी चौकशीच्या रडारवर आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, शिर्डीत भोंदू खरातचा मोठा भक्त परिवार होता. त्यामुळे त्याचे सर्वाधिक आर्थिक व्यवहार व मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहार तेथूनच चालायचे. तो आपल्या अनेक भक्तांच्या मालमत्ता खरेदी - विक्रीत भागीदार असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी नाशिकच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी अशोक खरात प्रकरणाची ईडी मार्फत चौकशी करण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ईडीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री यासंबंधी म्हणाले होते, अशोक खरात प्रकरणात एसआयटी सखोल चौकशी करत आहे. हा तपास रोजच्या रोज जाहीर करता येणार नाही. पण खरातची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. त्याच्या सर्व व्यवहारांची चौकशी होईल. ईडीनेही या प्रकरणाची माहिती घेतली आहे. त्यामुळे त्याची ईडी चौकशीही होईल.

### ब्रेकिंग न्यूज

## काँग्रेसला कळायला पाहिजे : पार्थ पवार

पुणे (दै. संध्या) : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिवंगत नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. येथील निवडणूक बिनविरोध करून अजित पवारांना श्रद्धांजली देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून करण्यात आली होती. असे असतानाही काँग्रेसने उमेदवार जाहीर केला. यावरून आता पार्थ पवारांनी थेट काँग्रेसला इशाराच दिला आहे. पार्थ पवार म्हणाले, माझे कोणाशी बोलणे झाले नाही. काँग्रेसला कळायला पाहिजे, काय करायचे ते. त्यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाबाबत मला माहीत नाही. सगळे मोठे लोक आहेत. सर्वांना माहीती आहे काय चालले आहे. त्यांनी विचार केला असेल तर करू द्या. पण त्यांना नंतर काय त्रास होईल महाराष्ट्रात, हे त्यांना दिसेल, अशा शब्दात पार्थ पवारांनी नाराजी व्यक्त करत इशारा दिला आहे. पुढे बोलताना पार्थ पवार म्हणाले, जे दादांसाठीचे प्रेम आहे लोकांच्या मनात, ते लोक विसरत नाहीत. अशावेळी एवढ्या मॅच्युअर पार्टीने हा निर्णय घेणे, जिथे एवढे मोठे नेते आहेत, अतिशय चुकीचे आहे. मला वाटते की आपण कोणाला थांबवू शकत नाही. जशी वेळ येते तसे सामोरे जावे लागते. आम्ही सामोरे जाऊ, आम्ही काही कोणाला फोन करणार नाही, जे काही नशिबात लिहिले आहे ते बघू.

**दै. संध्या अँकर** सुषमा अंधारेंचा टोला; एकनाथ शिंदेंच्या चौकशीची मागणी

# एसआयटीपेक्षा दमानियांचा तपास भारी

**मुंबई (दै. संध्या)**



भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिकच तापत चालले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जाहीर केलेल्या कॉल रेकॉर्ड्सवरून (CDR) आता शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "एका खासगी व्यक्तीला गोपनीय कॉल रेकॉर्ड्स कसे मिळू शकतात? हा 'ब्रीच ऑफ प्रायव्हसी'चा (गोपनीयतेचा भंग) गंभीर प्रकार असून, दमानियांचीच चौकशी झाली पाहिजे," अशी मागणी अंधारे यांनी केली आहे. तसेच एसआयटीपेक्षा दमानियांचा तपास भारी आहे, त्यांनाच प्रमुख करा" असा टोला लगावला. सुषमा अंधारे यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत अशोक खरात प्रकरणातील अनेक धक्कादायक पैलू मांडले आणि थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्र्यांवर निशाणा साधला.

अंजली दमानिया यांनी अशोक खरात, रुपाली चाकणकर आणि इतर नेत्यांमधील संभाषणाचे तपशील एआय (AI) ॲपच्या माध्यमातून मिळवल्याचा दावा केला होता. यावर आक्षेप घेत सुषमा अंधारे म्हणाल्या की, "दमानियांच्या दाव्यानुसार, चाकणकर यांनी खरातला १७७ वेळा, तर त्यांच्या बहिणीने २३६ वेळा फोन केले. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १६ वेळा तर दीपक केसरकर यांनीही खरातशी संवाद साधला. हे सर्व गोपनीय तपशील दमानियांकडे आले कुठून? त्यांना हे रेकॉर्ड्स कुणी पुरवले? जर एखादी खासगी व्यक्ती इतक्या सहजपणे कुणाचेही सीडीआर काढू शकत असेल, तर हा सुरक्षेचा मोठा प्रश्न आहे." यावेळी त्यांनी उपरोधिक टोला लगावत, " ज्यांनी सीडीआर काढले त्यांच्यावर कारवाई करावीच, पण ज्यांचे सीडीआरमध्ये नाव निघाले त्यांच्यावर काय कारवाई करणार? या सीडीआर प्रकरणात एकनाथ शिंदे यांचे नाव आहे. त्यांच्यावर काय कारवाई करणार? असा सवाल सुषमा अंधारे यांनी केला. सातारा ड्रग्जच्या प्रकरणात आम्ही अनेक आरोप केले, पण त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. राज्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्याच्या महिला आयोगाच्या आधीच्या अध्यक्षा यांनी इतक्या वेळा अशोक खरातला कॉल का केला? याची माहिती समोर आली पाहिजे. या काळात पुरावे नष्ट केले जाऊ शकतात. एकनाथ शिंदे आणि दीपक केसरकर ही नावे मोठी आहेत, त्यामुळे त्यांची चौकशी का केली जात नाही? असा सवाल सुषमा अंधारे यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्यावर एसआयटी कारवाई करणार आहे का? एसआयटी चांगले काम करेल अशी अपेक्षा आहे, असेही सुषमा अंधारे यांनी केली. एखादी माहिती अंजली दमानिया आणि माझ्यापर्यंत पोहोचते, पण तीच माहिती एसआयटीपर्यंत का पोहोचत नाही असा प्रश्न पडतोय. एसआयटीपेक्षा दमानियांचा तपास भारी आहे, त्यामुळे त्यांनाच एसआयटीचे प्रमुख करा," असा टोला सुषमा अंधारे यांनी लगावला.

अशोक खरात प्रकरणात नाशिकमधील एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची भूमिका संशयास्पद असल्याचा दावा सुषमा अंधारे यांनी केला. "आम्ही या अधिकाऱ्याबाबत एसआयटीला माहिती दिली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, खरातची चौकशी सुरू असतानाच त्याची पत्नी कल्पना, मुलगी सृष्टी आणि मुलगा अचानक गायब झाले आहेत. पोलिसांच्या नजरेखाली हे कुटुंब गायब होणे अनाकलनीय आहे," असेही त्या म्हणाल्या.

# नांदेड गँगवॉरने पुन्हा हादरले : युवा सेना शहराध्यक्षाची भररस्त्यात हत्या

**नांदेड (दै. संध्या)**



नांदेड शहर सोमवारी आणखी एका हत्येने हादरले. आज पहाटे 5.30 च्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या सत्ताधारी शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याची हल्लेखोरांनी भररस्त्यात तलवारीने सपासप वार करून निर्घृण हत्या केली. गत 3 दिवसांतील शहरातील हत्येची ही पाचवी घटना आहे. त्यामुळे नांदेड पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमेतवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सोनू कल्याणकर (35) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो सत्ताधारी शिवसेनेच्या युवा सेनेचा शहराध्यक्ष होता. सोनू कल्याणकर सोमवारी पहाटे 5.30 च्या सुमारास नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी गेले होते. त्यांच्यासोबत त्यांचा पाळीव कुत्राही होता. यावेळी शहरातील श्रीनगर भागातील पंचशील कापड दुकानालगतच्या कुमार ड्रेसेस समोर एका चारचाकीतून आलेल्या 6-7 हल्लेखोरांनी त्यांच्यावर लोखंडी रॉड, चाकू व तलवारींच्या सहाय्याने जीवघेणा हल्ला चढवला. हल्लेखोरांनी कल्याणकर यांची मान, पाठ व शरीराच्या विविध भागांवर वार करत त्यांना रक्तबंबाळ केले. या हल्ल्याची तीव्रता एवढी होती की, सोनू कल्याणकर जागीच कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी ते गतप्राण झाल्याचे पाहताच आपल्या वाहनातून पोबारा केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करत तपासासाठी विशेष पथके तयार केली. या प्रकरणी एका संशयिताला तत्काळ ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे सोनू कल्याणकर यांच्यावर यापूर्वीही एकदा गोळीबार झाला होता. पण त्यात ते बचावले होते. पण यावेळी हल्लेखोरांनी त्यांचा थेट जीव घेतला.

दुसरीकडे, पोलिसांनी सोनू कल्याणकर यांच्या हत्येनंतर तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. त्यात एक संशयित शहरालगतच्या झरी गावालगत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी तत्काळ तिकडे धाव घेतली असता संशयित पळून जात असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी पोलिसांनी त्याचा पाठलाग करत त्याच्या पायावर गोळी झाडली. त्यात तो जखमी झाला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

# संपादकीय

## पब्लिकचा नवा ट्रान्सपोर्ट

'घोडेवाला पीछे चाबूक...', अशी आरोळी पूर्वी दक्षिण मुंबईतील भुलेश्वर-काळबादेवी भागातून वाट काढत चाललेल्या व्हिक्टोरियाला कुणीतरी देत असे. तत्क्षणी व्हिक्टोरियाचालक त्याचा लांब चाबूक घोड्याऐवजी पाठीमागच्या आसनामागे छमकावण्याचा प्रयत्न करे. त्या वेळी मागे लोंबकळणारी काही खोडकर मुले लगेच पळ काढत. दक्षिण मुंबईतील वाहतूकसाधनांबाबतचे आणखी एक चित्र म्हणजे अब्दुल रहमान स्ट्रीट किंवा दाणा बंदर, जिंजीकर स्ट्रीट येथील दाटीवाटीतून दोनशे-तीनशे किलोचे कापडाचे गठ्ठे वाहून नेणारी हातगाडी भर उन्हात एक मजूर खेचत आहे. घामाच्या धारांनी अंगावरचा कपडा आणि शरीर पिळवटून निघाले आहे. पुलावर हातगाडी खेचताना मदतनीसाचा धक्का कमी पडतोय, असे वाटतेय, तर पुलावरून उतरताना गाडी घरंगळत अंगावर येतेय, अशी मजुराची केविलवाणी अवस्था. वाहनचालक, पादचारी या हातगाडीवाल्याचा रागराग करताहेत. एखाद्या वन वेत समोर बेस्टबस येऊन उभी ठाकली, तर टॅक्सी आणि बेस्टचालकांच्या चेपाचेपीत हातगाडीवाल्याची त्रेधातिरपीट होते आहे....ही दोन्ही चित्रे आता पालटू लागली आहेत. दक्षिण मुंबईतील घाऊक बाजारांमध्ये कोट्यवधींच्या मालाची उलाढाल होत असते. तो माल वाहून नेण्यासाठी मनुष्यबळावर चालणारी मालवाहू वाहने हा एक महत्त्वाचा कणा आहे. व्हिक्टोरियासारखी साधने अधिककरून विरंगुळ्यासाठीच उपयोगात यायची, मालवाहतुकीसाठी नाही. पाण्याची पिंपे, ऊस, बर्फ या वाहतुकीसाठी एका बैलाच्या गाड्या मात्र मुंबईत बरीच वर्षे दिसत. घाऊक बाजारपेठांमधली मालाची चढ-उतार ही बहुतकरून पाटीवाले, हातगाड्या यांच्या जोरावरच होते. हे हातगाडीवाले दिवसाला २५-३० किलोमीटरची रपेट आणि ८००-९०० किलोच्या मालाची ने-आण सहजच करतात. मध्यंतरी गजबजलेल्या रस्त्यांवर कार्यालयीन काळात हातगाड्यांना प्रवेशबंदी करण्यात आली होती. ट्रकमधून आलेला माल दुकानापर्यंत पोहोचवण्यासाठी या हातगाड्यांना पर्याय नसे. त्यामुळेच रविवारच्या दिवशी शटर खेचलेल्या दुकानाबाहेर हातगाड्या एकमेकांत गुंफवून विश्रांती घेणारे मजूर हे चित्र हमखास दिसे. मालवाहतुकीच्या या साधनांमध्ये गेल्या काही महिन्यांत लक्षणीय बदल दिसत आहेत. हातगाड्यांची जागा आता बऱ्याच ठिकाणी बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी किंवा तिचाकी पिक-अप वाहनांनी घेतली आहे. पाऊण ते लाखभर रुपयांपर्यंतच्या या गाड्या शे-पाचशे किलोचा माल घेऊन ताशी २५ किलोमीटरपर्यंत वेगाने कोणताही आवाज न करता धावतात. या वाहनांवर पुढच्या बास्केटमध्येही ओतप्रोत माल भरल्याचे दिसते. वहनक्षमता आणि वेगमर्यादेनुसार या वाहनांना आरटीओची नोंदणी लागते किंवा नाही, ते ठरते. नोंदणी आली की पळवाटाही येतात. त्याप्रमाणे काही वाहनांचा कागदावरचा वेग ताशी २५ किलोमीटरच्या आत असतो, त्यामुळे त्या नोंदणीतून सुटतात; परंतु प्रत्यक्षात मात्र त्या अधिक वेग गाठू शकतात. आरसे, दिवे हे बंधन असले, तरी कित्येकांना पाठीमागचा दिवा नसतो. त्यामुळे रात्री किंवा पहाटे अपघाताला निमंत्रण मिळण्याचा धोका असतो. हातगाड्या, पाटीवाल्यांचीही पूर्वी नोंदणी करावी लागे. तशी या वाहनांची नोंदणी होते का, त्यांचे काही नियमन आहे का, याविषयी संदिग्धता आहे. एक मात्र नक्की, पूर्वी अक्षरशः स्वतःला हातगाडीला जुंपून घेऊन माल खेचणाऱ्या मजुरांचे श्रम अशा वाहनांमुळे कमी होत आहेत. माथेरान किंवा पश्चिम बंगालमधल्या हातरिक्षातही माणसं वाहून नेण्याची पिळवणूक होते, त्यावर ई-रिक्षांचे पर्याय आले. तर मुंबईतील पब्लिकच्या नव्या ट्रान्सपोर्टमध्येही असे बदल स्वागतार्हच आहेत. फक्त वेग, वजन आणि वहन याबाबतीतली किमान नियम पाळून अपघातांना निमंत्रण मिळणार नाही, याकडेही लक्ष हवे. सार्वजनिक वाहतुकीबाबतच्या संशोधनाला आपण कमी महत्त्व देत असल्याने या अशा श्रमिकांच्या वाहनांवर पुरेसा विचार करत नाही. वस्तू-जिन्नसांची गरज सर्वांनाच असते; परंतु या छोट्या वाहकांच्या बाबतीत मात्र व्यापाराव्यतिरिक्त रस्त्यावरील इतर वाहनचालकांचा हेटाळणीचा सूर असतो.

## संस्कृत सुभाषित

सर्वमेव परित्यज्य शरीरमनुपालयेत्
शरीरस्य प्रणष्टस्य सर्वमेव विनश्यति

अर्थ – सर्व गोष्टींचा त्याग करावा लागला तरीही प्रथम शरीराचे नियम पाळायला हवेत. कारण शरीराचा नाश झाला तर सर्वस्वच नष्ट होते.

## गुरु वचन



### जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव.

आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे–बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता.

आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.

यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले. यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.

तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक 'द स्टोरी ऑफ लाईफ' प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.

इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच नसती. म्हणूनच केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच आपण विजय मिळवू शकतो हे विसरता कामा नये.

## उपदेशकथा

### परिस

एक माणूस नदीच्या काठी हातातल्या लोखंडीसाखळीला एकेक दगड घेऊन लावून पहात होता. त्याचा तो उद्योग बराच वेळ चालला होता. लोकांनी त्याला विचारले, हे तू काय करतो आहेस? तो उत्तरला परिसाचा शोध घेतोय.

संध्याकाळी लोकांनी पाहिले की त्याच्या हातातली साखळी सोन्याची झालेली होती व तरीही तो काठाला दगड शोधतच होता. लोकांनी त्याला पुन्हा विचारले, त्यावर तो म्हणाला, मला परिस सापडला होता. पण साखळीला दगड लावून फेकून द्यायच्या सवयीने मी तो परिसही फेकून दिला. तो आता पुन्हा शोधत आहे.

कथा उपदेश : जीवनाचे सोने करणारा परिस फेकून देऊ नका.

## पंचांग

| | |
|---|---|
| ७ एप्रिल २०२६ | योग:व्यतीपात १६:१५:५९ |
| मंगळवार | करण:तैतिल १६:३४:५० |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर २९:४८:४३+ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | सूर्य:मीन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:वृश्चिक |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४५ |
| मास– चैत्र | मुस्लिम मास – शव्वाल |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – १८ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:पंचमी १६:३४:५० | जागतिक आरोग्य दिन |
| नक्षत्र:ज्येष्ठा | मांगीरबाबा यात्रा – शेंद्र |
| २९:५३:३७+ | (कं.) (छं. संभाजीनगर) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ११०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 3 | | | | |
| 9 | 7 | | 2 | 8 | | | | 1 |
| 1 | 3 | | | 5 | | 4 | | |
| 3 | | | 8 | 4 | | 7 | | |
| 7 | 4 | 1 | | | | 8 | 3 | 5 |
| | | 2 | | 7 | 1 | | | 6 |
| | | 4 | | 6 | | | 5 | 8 |
| 8 | | | | 2 | 9 | | 7 | 4 |
| | | | | 1 | | | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 1 | 6 |
| 3 | 1 | 2 | 7 | 5 | 6 | 9 | 8 | 4 |
| 5 | 9 | 6 | 4 | 1 | 8 | 7 | 3 | 2 |
| 7 | 6 | 5 | 1 | 3 | 9 | 4 | 2 | 8 |
| 4 | 2 | 9 | 8 | 6 | 7 | 1 | 5 | 3 |
| 1 | 8 | 3 | 5 | 4 | 2 | 6 | 9 | 7 |
| 2 | 7 | 4 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 1 |
| 9 | 3 | 8 | 6 | 7 | 1 | 2 | 4 | 5 |
| 6 | 5 | 1 | 3 | 2 | 4 | 8 | 7 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३६ – स्पेनचे अध्यक्ष झामोरा पदच्युत.
- १९४८ – वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन जागतिक आरोग्य संघटनेची–व्हूची स्थापना.

### राष्ट्रीय

- २००२ – कावेरीकाठी उत्खननात २००० वर्षे जुन्या नवग्रहांच्या मूर्ती व शिवलिंग सापडले.
- २००६ – जम्मू काश्मीरच्या चिनाब नदीत बस बुडाल्या मुळे ९० जण ठार झाले.
- २००७ – झारखंडमध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात सीआयएसएफच्या दोन कर्मचाऱ्यांसह ६ जण ठार झाले.
- २००७ – तामिळनाडूत कथितरित्या स्फोटक पदार्थ घेऊन जाणाऱ्या कारचा सेंतुर गावाजवळ स्फोट झाल्याने २० जण ठार व इतर १८ जण जखमी झाले.

### जन्म

- १७७० – आंग्लकवी विल्यम वर्ड्सवर्थचा जन्म.
- १८८४ – जॉन हचिन्सन या अमेरिकन वनस्पती शास्त्रज्ञाचा जन्म.
- १९११ – साहित्यिक, समीक्षक वा.ल. कुलकर्णी यांचा जन्म.
- १९२० – जागतिक कीर्तीचे सतारवादक पं. रवी शंकर यांचा जन्म.
- १९३९ – फ्रान्सिस फोर्ड कपला या गॉडफादरच्या निर्मात्याचा जन्म.

### निधन

- १९३५ – भारताचे एडिसन म्हणून प्रसिद्ध असलेल्या शंकर आबाजी भिसे यांचे निधन.
- १९४७ – जगप्रसिद्ध अमेरिकन मोटर उत्पादक हेन्री फोर्ड यांचे निधन.
- १९५५ – 'थेडा बारा' या मूकपटातील अभिनेत्रीचे निधन. तिचे नाव उलटे करून वाचले, की अरब डेथ असे होते.

## : SMS :

Teacher: "So we proved that when 'A' is equal to 'B' and 'B' is equal to 'C' then 'A' equal to 'C'. Ron give me an example for this."
Ron: "I love my teacher, my teacher loves her daughter, therefore I love my teacher's daughter..."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.२ | २१.३ |
| अहमदनगर | ३२.७ | २०.१ |
| अकोला | ३५.२ | २५.३ |
| अमरावती | ३४.८ | २५.३ |
| बीड | ३८.३ | २४.३ |
| भंडारा | ३६.३ | २२.४ |
| बुलढाणा | २९.८ | १७.४ |
| चंद्रपूर | ३८.३ | २४.९ |
| चेन्नई | ४३.१ | २७.२ |
| नवी दिल्ली | २९.३ | १८.९ |
| धुळे | ३२.३ | २१.९ |
| गोंदिया | ३५.६ | २२.२ |
| जळगाव | ३५.५ | २४.३ |
| कोल्हापूर | ३२.६ | १९.९ |
| लातूर | ३३ | २३.६ |
| मुंबई | ३२.७ | २६.७ |
| नागपूर | ३५.२ | २३.१ |
| नांदेड | ३५ | २५.१ |
| नंदूरबार | ३० | २१.८ |
| नाशिक | ३०.९ | १९.२ |
| पुणे | ३०.१ | १९ |
| पंढरपूर | ३५.३ | २४ |
| सातारा | ३२.३ | १७.५ |
| सांगली | ३४.६ | २१.६ |
| सोलापूर | ३५.३ | २५.१ |
| वर्धा | ३६.८ | २५.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा :पश्चिम जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा.

**वृषभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. आजचा दिवस शुभ आहे.

**मिथुन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. व्यवहारात हमखास यश मिळेल.

**धनु :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.

**कर्क :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.


**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: दक्षिण संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या–घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल.

**कन्या :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा :पश्चिम कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

**मीन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ११०



### आडवे शब्द

१. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असे सांगणारा नेता
१०. विषमाच्या विरुद्ध
१२. केस काळे करण्याचे साधन
१३. गाणे गाणारा
१४. पर्ण
१५. लग्नातील नवरा मुलगा
१७. मळलेला
२०. नूतन
२१. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
२५. जमीनजुमला
२७. शिर्डीचे संत
२९. गंध
३०. शारीरिक श्रम, अंगमेहनत,३३. सदोदित
३४. सासरच्या विरुद्ध
३५. भाकरीचे एक धान्य
३६. पंकज, ३७. टिंगल
३८. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण
३९. कौशल्य
४१. रेशमाचे जाडसर कापड
४२. रखवालदार
४४. तात्पर्य, ४५. चांदणी
४७. भेग, चीर
४८. रांग, दर्शनासाठी ओळ
४९. पातक
५०. द्वाड, खोडकर (हिंदी)
५३. बेशुद्ध, चैतन्यहीन
५५. किंचित कडू चव
५६. उत्सवाचे दिवस
५७. भारवाहक
५८. रंग
६१. लहान पोर
६३. सुट्टीचा दिवस
६६. हसू येण्याजोगे
६८. रथ चालविणारा
६९. अधिक श्रेष्ठ, वरचढ
७०. नेता
७१. पांढऱ्या टोपीचे गवत
७२. नवे कोरे
७३. तीव्र ऊन
७४. पोत्याचे कापड

### उभे शब्द

१. स्वेटरचा उबदार धागा
२. मनाचा ओढा
३. मोजणी
४. एक तिखटमिठाची वडी
५. मियांची नकली वेणी
६. धेनु, गोमाता
७. धडधड
८. पुरुषांच्या कपाळावरील चंदनाचा ठिपका
९. ललाट
१०. उंच सखल नसलेले
११. अंत:करण
१६. अरण्यवास
१७. मज्जाव, बंदी
१८. गुरांचे खाद्य
१९. तांदूळ
२२. पुष्कळ
२३. त्याप्रमाणे
२४. महाडचे सुप्रसिद्ध तळे
२५. अखबार
२६. बाज विणण्याचे कापडी पट्टी
२८. मूर्ख
३०. काम, कार्य
३१. लहानसहान
३२. '––– मे हड्डी' एक म्हण
३३. किरकोळ सामान
३५. पावा
३६. मकबरा थडगे
३८. पवित्र
४०. माळ, हार
४३. विपुलता
४५. संतापी
४६. लोखंड घासण्याचे एक हत्यार
४९. शेराचा चौथा भाग
५१. ताणलेल्या दोरीचा आवाज
५२. मावा
५३. आवस, पौर्णिमेच्या विरुद्ध
५४. आश्चर्य
५९. दीपक
६०. निवड न करता एकच
६१. भाताची पानातील सुबक वाढ
६२. घागरा
६४. दुधाचे दही बनविणारे
६५. अखंडता
६६. सोने
६७. प्रतिस्पर्धी
६८. मलई
६९. अव्याहत
७०. मुलाची मुलगी
७१. थंड

### जम्बो शब्दकोडे क्र. १०९ चे उत्तर

आडवे उत्तर १.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

उभे उत्तर : १.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# पुण्यभूमीची ओळख पुसण्याचे धर्मांधांचे षडयंत्र हाणून पाडा

## आमदार टी. राजा सिंह

## हडपसर (जिल्हा पुणे) येथील हिंदु राष्ट्र-जागृती सभेत ११ हजारपेक्षा अधिक हिंदूंचा 'हिंदु राष्ट्रा'चा उद्घोष

**पुणे (दै. संध्या)**

हडपसरसारख्या भागात गोहत्या करणारे धर्मांध पोलिसांसमोरच गोरक्षकांना चोप देत आहेत आणि धर्मांध छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीवर दगडफेक करत आहेत. स्थिती अशीच राहिली, तर हिंदूंच्या मुलांचे भवितव्य अंध:कारमय आहे. तरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीची ओळख पुसण्याचे षडयंत्र हिंदूंनी जागरूक राहून हाणून पाडले पाहिजे. हिंदूंमध्ये सुप्त झालेले क्षात्रतेज त्यांना आता जागृत करावे लागेल, असे आवाहन भाग्यनगर येथील श्रीराम युवा सेनेचे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजा सिंह यांनी केले. ते ५ एप्रिल या दिवशी हडपसर येथील कै. मारुतराव काळे शाळेचे मैदान, काळे पडळ येथे आयोजित हिंदु राष्ट्र-जागृती सभेत बोलत होते.






या सभेत सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये, तसेच हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनीही मार्गदर्शन केले. या सभेसाठी ११ हजारपेक्षा अधिक हिंदूंनी उपस्थिती दर्शवून हिंदूंच्या संघटितपणाचा अविष्कार दाखवून दिला. संपूर्ण 'वन्दे मातरम्'ने सभेची सांगता झाली! प्रारंभी शंखनादानंतर सद्गुरु स्वाती खाडये यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण केला. पुरोहित श्री. प्रीतम तिखेगुरुजी आणि पुरोहित श्री. अरुण भिसेगावकर गुरुजी यांनी केलेल्या वेदमंत्रपठणामुळे चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. सूत्रसंचालन श्री. चैतन्य तागडे यांनी केले, तर समितीच्या कार्याच्या परिचय श्री. पराग गोखले यांनी करून दिला. या सभेत हिंदूंनी विविध प्रसंगांमध्ये स्वरक्षण कसे करावे याची विविध प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. या प्रसंगी आमदार टी. राजासिंह म्हणाले, "यापुढील काळात हिंदूंनी जातींमध्ये विभाजित न रहाता 'मी हिंदू' आहे या भावनेने एकत्र येणे आवश्यक आहे. ज्यांची विचारसरणी 'गजवा-ए-हिंद'ची आहे, त्यांना हिंदूंना पैसा का म्हणून द्यावा. त्यामुळे धर्मांध-जिहादी यांच्याकडून कोणतीही खरेदी करू नका. धर्मांधांची आर्थिक रसद कापली, तर 'लव्ह जिहाद' 'लँड जिहाद' आणि धर्मांतराची विषवल्ली आपोआप नष्ट होईल. हिंदूंच्या घामाचा पैसा 'मायनॉरिटी फंड'च्या नावाने अल्पसंख्यांकांवर उधळला जात आहे. हा निधी तात्काळ बंद करून तो गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी वापरावा, अशी आमची मागणी आहे." हिंदुत्वामुळे देश पिछाडीवर जाईल असा अपप्रचार केला जातो; मात्र हिंदु राष्ट्र ही संकल्पना भारताचा मूळ स्वभाव आहे. असे असले, तरी २ दशकांपूर्वी जिहादी आतंकवाद लपवण्यासाठी हिंदु आतंकवाद, भगवा दहशतवाद असे शब्दप्रयोग हे हिंदुत्वनिष्ठ संघटनांना दडपण्याचे एक 'टूलकिट' होते. त्यामुळे मालेगाव बॉंबस्फोट, मडगाव स्फोट प्रकरण, दाभोलकर-पानसरे-कलबुर्गी-गौरी लंकेश या प्रकरणांत हिंदुत्वनिष्ठांना गोवण्यात आले. त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. याच प्रकारे सनातनचे साधक समीर गायकवाड यांना कॉ. गोविंद पानसरे प्रकरणात नाहक अटक करण्यात आली. सामान्य शेतकरी कुटुंबातील समीर यांचा तपास यंत्रणांनी केलेला छळ आणि पुरोगाम्यांनी केलेली बदनामी यांमुळे त्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले. त्यामुळे त्यांचे झालेले निधन हा व्यवस्थेने घेतलेला बळी आहे. याला हिंदूंनी विरोध केला पाहिजे!

पुणे शहरात पुरंदर भागात 'लँड जिहाद' मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शहर आणि जिल्ह्यात अनेक मंदिरांमध्ये मूर्तींची विटंबना होत असून या घटना दडपण्याठी पोलीस धर्मांध आरोपींना माथेफिरू ठरवत आहेत. प्रत्येक घटनेत आरोपी 'माथेफिरू', कसा असू शकेल? तरी मंदिरांच्या संदर्भात वारंवार घडणाऱ्या या घटनांमागील मुख्य सूत्रधार शोधून त्यांच्यावर पोलीस प्रशासनाने कारवाई करणे अपेक्षित आहे. पोलीस अनेक घटनांमध्ये जीवावर उदार होऊन गोरक्षण करणाऱ्या गोरक्षकांवर खोटे गुन्हे नोंद करून कसायांना मात्र मोकाट सोडत आहे, अशा अनेक तक्रार यापुढील काळात असे प्रकार होता कामा नयेत. पुण्यातील हिंदूंची मंदिरे, सारसबागेत होणारी धर्मांधांची घुसखोरी यांसह अनेक ठिकाणी धर्मांधांची मुजोरी वाढत आहे. तरी धर्मांधांच्या वाढत्या कारवाया रोखून हिंदूंच्या श्रद्धास्थानांवर येण्यापासून त्यांना प्रतिबंध करण्यात यावा यांसाठी, तसेच त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी येणाऱ्या १५ दिवसांत एक भव्य आंदोलन घेण्यात येणार आहे. प्रत्येक शहर, गाव येथील बांगलादेशी घुसखोर शोधणे आवश्यक असून या मोहिमेला गती येण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर बांगलादेशी घुसखोरांना हाकलून लावण्याचा ठराव होणे आवश्यक आहे." माजी सहधर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृती प्रतिष्ठानचे महामंत्री श्री. विद्याधर नारगोलकर, भाजप पुणे कँटोन्मेंटचे सरचिटणीस श्री. समीर शेंडकर, भाजप नगरसेवक श्री. मारुति (आबा) तुपे, भाजप नगरसेवक श्री. राजेंद्र काशिनाथ भिताडे, भाजप नगरसेविका सौ. उज्वला जंगले, भाजप नगरसेविका सौ. प्राची अल्हाट, भाजप पुणे सरचिटणीस श्री. बाळासाहेब घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक निवृत्ती अण्णा बांदल, शिवसेना नगरसेविका सौ. मोनिका निलेश पवार, शिवसेनेचे नगरसेवक श्री. गणेश कामठे, उरळी देवाची येथील शिवसेना नगरसेविका शारदा भैरु भाडळे (माई) प्रतापगड उत्सव समितीचे श्री. विनायक सणस, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सौ. कल्पना धनंजय हांडे, सौ. सुवर्णा खर्चे, उद्योजक श्री. कृष्णानंद नाईक, हिंदुत्वनिष्ठ श्री. रवींद्र घुले, ह. भ. प. तुषार महाराज चौधरी, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुणे जिल्हा संयोजक ह.भ.प. दत्तात्रय चौरघे महाराज पू. पप्पाजी पुराणिक, सनातन संस्थेच्या संत पू. (सौ.) मनिषा पाठक आणि पू. (सौ.) अंजली करंबेळकर, आदरणीय सौ. सरस्वती अमृतकरताई, 'वेद वासुदेव प्रतिष्ठान'चे अध्यक्ष श्री. अजित तुकदेव

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'दगडूशेठ' गणपतीला 51 लाख सुवासिक पुष्पांचे अर्घ्य

- श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळ
- वासंतिक उटी, मोगरा महोत्सव

पुणे (दैनिक संध्या) : सुवासिक विविधरंगी फुलांनी सजलेले श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर आणि लाडक्या गणरायाचे रुप मोगरा महोत्सवाच्या निमित्ताने गणेशभक्तांनी अनुभविले. लाडक्या बाप्पाचे फुलांमध्ये विराजमान झालेले रूप डोळ्यांमध्ये साठविण्यासाठी पुणेकरांनी मोठया संख्येने गर्दी केली. मोग-याच्या फुलांसह लिली, झेंडू, जास्वंद, गुलाब, चाफा यासारख्या तब्बल ५१ लाख फुलांनी गाभा-यासह सभामंडपात आकर्षक सजावट करण्यात आली. गणरायाला फुलांचे जणू अर्घ्य दिल्याचा भास यावेळी होत होता. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात वासंतिक उटी, मोगरा महोत्सव आयोजित करण्यात आला. यावेळी संत साहित्यिक डॉ. आरती दातार यांच्या हस्ते आरती करण्यात आली. ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गणरायाला शुंडाभूषण, मुकुट आणि विविध फुलांची आभूषणे देखील परिधान करण्यात आली होती. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, दोन दिवसांपासून पुष्पसजावटीची तयारी कारागिर करीत होते. यंदाच्या पुष्पसजावटीमध्ये मोगरा, गुलाब, लिली, झेंडू, शेवंती, गुलछडी, चाफा, गुलाब पाकळी तसेच कमळ, जाई-जुई, जास्वंद यांसह अनेक प्रकारची फुले वापरण्यात आली होती. मंदिरात रंगीबेरंगी फुलांची सजावट प्रत्येक जण आपल्या मोबाईलमध्ये टिपत होता. गणरायाच्या चांदीच्या मूर्तीला उटीचे लेपन करण्यात आले. तसेच मोगरा महोत्सवासह वासंतिक उटीचे भजन अखिल भारतीय वारकरी मंडळातर्फे करण्यात आले.



### तुळशीबागेत चोरट्यांचा सुळसुळाट; खरेदीसाठी आलेल्या महिलांकडील दागिने चोरी

पुणे (दैनिक संध्या) : महिला वर्गाचे खरेदीचे हक्काचे ठिकाण असलेल्या तुळशीबागेत महिलांकडील दागिने, रोकड चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी खरेदीसाठी आलेल्या महिलांकडील ७२ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून ५२ हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरट्याने लांबविल्याची घटना नुकतीच घडली. या प्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला तुळशीबागेत शनिवारी (४ एप्रिल) दुपारी चारच्या सुमारास खरेदीसाठी आली होती. तुळशीबाग गणपती मंदिर परिसरात चोरट्याने पिशवीत ठेवलेले मंगळसूत्र चोरून नेले. दुसऱ्या एका घटनेत रविवारी (५ एप्रिल) दुपारी तुळशीबागेत खरेदी करणाऱ्या महिलेच्या पिशवीतून २० हजारांचे मंगळसूत्र चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ५५ वर्षीय महिला वारजे-एनडीए रस्त्यावरील उत्तमनगर भागात राहायला आहे. रविवारी दुपारी दीडच्या सुमारास त्या तुळशीबागेत खरेदी करत होत्या. त्या वेळी गर्दीत महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी पिशवीतून मंगळसूत्र चोरून नेले. पोलीस कर्मचारी गोरे तपास करत आहेत.

---

## चाकण ग्रामीण रुग्णालयाला अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा

### पुण्यातील महा एनजीओ फेडरेशनचा पुढाकार; सीएसआरमधून मोठी मदत

**पुणे (दै. संध्या)**

महा एनजीओ फेडरेशन यांच्या माध्यमातून आणि कार्डमॉम लॉजिस्टिक असेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत चाकण येथील ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, जीर्ण झालेल्या पोस्टमार्टम कक्षाची पूर्णपणे पुनर्बांधणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे परिसरातील आरोग्य सेवांना मोठा बळ मिळणार आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, कार्डमॉम लॉजिस्टिक्स असेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापक अजित पाटील, दुष्यंत डगावकर महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, मुकुंद शिंदे, योगेश बजाज, तसेच



वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत रुग्णालयास अत्याधुनिक केमिकल कचरा व्यवस्थापन यंत्रणा, डिजिटल एक्स-रे मशीन, लसीकरणासाठी विशेष फ्रीज, चार गिझर, पाच स्कॅनर व प्रिंटर, चार अत्याधुनिक वजन काटे, दहा डिजिटल बीपी मशीन आणि दहा पल्स ऑक्सिमीटर उपलब्ध करून देण्यात आले. तसेच, अत्यंत खराब अवस्थेतील पोस्टमार्टम कक्षाचे संपूर्ण नूतनीकरण करून तो सुसज्ज करण्यात आला आहे. शेखर मुंदडा यांनी सीएसआरच्या माध्यमातून लोकाभिमुख आणि परिणामकारक प्रकल्प कशा प्रकारे राबविता येतात, यावर मार्गदर्शन केले. अजित पाटील यांनी सांगितले की, कंपनी सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांना नेहमीच सहकार्य करत असून, आरोग्य क्षेत्रात आणखी कोणत्या सुविधा देता येतील यावरही कंपनीचा सकारात्मक विचार आहे.

उपक्रमाचे संयोजक आणि महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे यांनी सांगितले की, या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करून देणे हा आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवाजी चव्हाण, राहुल जगताप, अपूर्वा कारवा, कोमल गांधी यांनी समन्वय साधला. आदिवासी व ग्रामीण भागातील तसेच कामगार वर्गातून या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

---

## रिंगरोडच्या कामांबाबत तक्रारींचा पाढा



**पुणे (दै. संध्या)**

मुळशी तालुक्यातील रिंगरोडसाठी होणाऱ्या अवैध उत्खननामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, रॉयल्टी न भरल्यास थेट शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर बोजा चढवण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. पौड येथील खरीप हंगाम व पाणीटंचाई आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुळशी पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या या बैठकीत कातरखडक, आंधळे यांसह विविध गावांतील नागरिकांनी रिंगरोडच्या कामाबाबत तक्रारींचा पाढा वाचला. मुरूम आणि मातीची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले यांनी स्पष्ट केले की, शेतातून माती काढताना रॉयल्टी भरली नसल्यास त्याचा दंड थेट शेतकऱ्याला भरावा लागेल. या बैठकीला आमदार शंकर मांडेकर, तहसीलदार विजयकुमार चोबे, गटविकास अधिकारी सुधीर भागवत, सभापती मंदा शेळके, उपसभापती दगडूकाका करंजावणे यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य, सरपंच आणि ग्रामसेवक उपस्थित होते. बैठकीत खरीप हंगाम नियोजनासह पाणीटंचाईचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

---

## पादचारी महिलांचे दागिने हिसकावले

**पुणे (दै. संध्या)**

एरंडवणे भागात शनिवारी (४ एप्रिल) सकाळी फिरायला निघालेल्या पादचारी महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपयांचे दागिने हिसकावून नेण्यात आले. याबाबत एका महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिवाजीनगर भागात शनिवारी सकाळी सहाच्या सुमारास एका पादचारी महिलेच्या गळ्यातील एक लाख ३४ हजार रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्याने हिसकावून नेले. याबाबत महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लोहगाव परिसरात पादचारी महिलेच्या गळ्यातील ६० हजार



रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पुणे रेल्वे स्थानक परिसरात पीएमपी स्थानकात प्रवाशाच्या खिशातील मोबाइल संच चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. शहरात पादचारी महिलांकडील दागिने हिसकाविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

---

## पेशवेकालीन तुळशीबाग श्रीराम मंदिरात हनुमान जयंती सोहळा

### श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने आयोजन ; कीर्तनकार दर्शनबुवा वझे यांचे हनुमान जन्माचे कीर्तन

**पुणे (दै. संध्या)**

श्रीराम-लक्ष्मण-जानकी... जय बोलो हनुमान की... अशा नादघोषात हनुमानाच्या चरित्राचे वर्णन करीत हनुमान जन्माचे कीर्तन पेशवेकालीन तुळशीबाग राममंदिरात पार पडले. श्रीराम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्तीसमोर असलेल्या पाषाणातील उभ्या हनुमानाच्या मूर्तीला हनुमान जयंतीनिमित्त रेशमी वस्त्रे व दागिने घालण्यात आले होते. तर, मंदिरावर आकर्षक फुलांची सजावट देखील करण्यात आली.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम जन्मोत्सवानिमित्त तुळशीबाग येथील राम मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन



करण्यात आले होते. त्याची सांगता हनुमान जयंतीच्या दिवशी झाली. संस्थानचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, विश्वस्त भरत तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता. पुणे प्रांताचे सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेल्या देखण्या मंदिरामध्ये यंदाचे श्रीरामनवमी उत्सवाचे अखंडीत २६५ वे वर्ष साजरे झाले.

हनुमान जयंतीच्या दिवशी सकाळी ब्रह्मवृंदाकडून श्रीहनुमंतास रुद्राभिषेक व सकाळी ६.३० वाजता ह.भ.प.दर्शनबुवा वझे यांचे श्रीहनुमान जन्माचे कीर्तन झाले. याशिवाय उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम, ललीत व पायघडीचे कीर्तन आणि समस्त तुळशीबागवाले परिवाराकडून श्रीरामराज्याभिषेक सोहळा देखील पार पडला.

---

## पुणे भारत गायन समाज व गोपाळ गायन समाजाला प्रत्येकी ५ लाखांचा निधी प्रदान

### ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे व रमा परांजपे यांच्यातर्फे देणगी प्रदान कार्यक्रम

**पुणे (दै. संध्या)**

संगीत क्षेत्रात शतकोत्तर परंपरा लाभलेल्या पुणे भारत गायन समाज व गोपाळ गायन समाज या दोन प्रतिष्ठित संस्थांना प्रत्येकी रुपये पाच लाखांची देणगी ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब विष्णू परांजपे व त्यांच्या पत्नी रमा परांजपे यांनी दिली. सारसबागेतील पेशवे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात



दोन्ही संस्थांच्या विश्वस्तांनी हा निधी स्वीकारला. यावेळी पुण्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. रामचंद्र परांजपे यांचे वडील स्व. बापूसाहेब उर्फ वि. रा. परांजपे व आई कमलाबाई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एकूण दहा लाख रुपयांची देणगी देण्यात आली. यावेळी श्री देवदेवेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश भागवत तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब विष्णू परांजपे हे श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे विद्यमान उपाध्यक्ष आहेत. पुणे भारत गायन समाज संस्थेच्या शैला दातार, शिल्पा पुणतांबेकर, सावनी दातार तसेच गोपाळ गायन समाजातर्फे विकास कशाळकर, राधिका जोगळेकर यांनी धनादेश स्वीकारला.

रमेश भागवत म्हणाले, पुण्यामध्ये मोठ्या प्रमाणात संस्था आहेत. उदार मनाचे लोक देणगी देतात म्हणून संस्था वाढत आहेत. आश्रयदात्यांशिवाय संस्था पुढे जाऊ शकत नाहीत. पुणे शहर हे संस्थात्मक शहर आहे.

त्यामुळे संस्थांना मिळणाऱ्या निधीचा विनियोग चांगला केला तर 'अर्थाला' अर्थ आहे, असेही त्यांनी सांगितले. महेश सूर्यवंशी म्हणाले, पुण्यामध्ये सातत्याने कार्यरत असलेल्या आणि उत्तम काम करणाऱ्या संस्थांचा सन्मान योग्य पद्धतीने व्हायला हवा. पुण्याची ओळख ही सांस्कृतिक राजधानी म्हणून आहे. परंतु त्यासाठी काहीही होत नाही. मुख्यमंत्री यांनी देखील याविषयी दखल घेतली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### कुमार आशिर्वाद यांनी पदभार स्वीकारत नागपूरला 'बेस्ट ऑफ बेस्ट' देण्याची ग्वाही

नागपूर (दैनिक संध्या) : शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प, विकासकामे आणि लोकहिताच्या योजनांना आता नव्या गतीची अपेक्षा निर्माण झाली आहे. नवनियुक्त जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सोमवारी पदभार स्वीकारल्यानंतर स्पष्ट भूमिका मांडत, "प्राधान्यक्रम ठरवून कामे फास्ट ट्रॅकवर नेऊ. नागपूरकरांना 'बेस्ट ऑफ बेस्ट' देण्याचा प्रयत्न राहील," असे सांगितले. मावळते जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडून पदभार स्वीकारल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना आशिर्वाद म्हणाले की, नागपूर जिल्ह्यात अनेक मोठे प्रकल्प सुरू असून विकासकामेही मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. ही कामे वेळेत आणि वेगाने पूर्ण व्हावीत यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने प्राधान्यक्रम ठरवला जाईल. लोकहिताच्या योजनांना गती देतानाच जनसहभागालाही विशेष महत्त्व दिले जाईल. गेल्या तीन वर्षांत सोलापूर जिल्हाधिकारी म्हणून काम करताना पाणीटंचाई, दुष्काळसदृश्य परिस्थिती, पूर आणि संवेदनशील धार्मिक स्थळांशी संबंधित प्रश्न हाताळल्याचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. "नागपूरची भौगोलिक व सामाजिक रचना वेगळी आहे. पुढील दीड महिन्यात संपूर्ण जिल्ह्याचा सखोल अभ्यास करून कामांची दिशा निश्चित केली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा हा जिल्हा असल्याने येथील लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून त्यांच्या मतदारसंघातील अडचणी जाणून घेतल्या जातील. शासनाच्या प्राधान्यानुसार आणि स्थानिक गरजांनुसार कामांना गती देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

### एकेकाळी 1400 एकर जमिनीचे मालक, आता मोहफुले वेचून जगण्याची वेळ



साकोली (जि. भंडारा) (दैनिक संध्या) : नागझिरा व्याघ्र प्रकल्प परिसरात पूर्वी जमीनदारी होती. लगान वसूल करून ते उपजीवीका करत होते. स्थानिकांना रोजगाराही मिळत होता. पण, ही जागा व्याघ्र प्रकल्पात गेली. काही जागा अजूनही प्रकल्पात जात आहे. मोहफुले वेचून उपजीविका करणे अशी विदारक परिस्थिती आता गोंड राजाच्या वंशजांवर येऊन ठेपली आहे. ही कहाणी आहे तुकारामबापू हरिसिंग मोकाशी (गोंड) यांची. ते साकोली तालुक्यातील जांभळी येथील रहिवासी. त्यांच्याकडे १४ शे एकरपेक्षा जास्त जंगल त्यांच्या मालकीचे होते. त्यावेळी स्वातंत्र्यानंतर त्यांनी ६०० एकर जागा एफडीसीएला दान दिली. ७५० एकरचा एक पट्टा पांगळी येथे होता. त्यांचा मुलगा रामचंद्रबापू मोकाशी यांनी यासंदर्भात भूमिअभिलेख साकोली यांच्याशी २००० मध्ये पत्रव्यवहार केला होता. त्याचे उत्तर काही मिळाले नाही. रामचंद्रबापू यांना चार मुली आणि एक मुलगा आहे. चारही मुलींचे लग्न झाले. भूवनशहाँ हा वारस जांभळीत राहतो. त्यानेही त्या कागदपत्रांची माहिती घेतली. तेव्हा ती जागा आता सरकारजमा झाली. पण, ती जागा सरकारजमा का झाली, यासंदर्भात त्यानेही भूमिअभिलेख विभागाला पत्रव्यवहार केली. मात्र, त्यालाही त्याचे उत्तर मिळाले नाही. आता जमीनदारी गेल्यामुळे मोहफुले वेचून उपजीविका करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. उर्वरित जांभळी गावालगतच्या थोड्याफार जमिनीत धानपीक लावले. पण, त्याची खरेदी सरकारने केली नाही. त्यामुळे ते अडचणीत आले आहेत. पांगळी येथील जमिनीचा मोबदला मिळावा, यासाठी त्यांनी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या उपवनसंरक्षक, गोंदिया, व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक, साकोली यांच्याशी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रव्यवहार केला. पुढे आश्वासनाव्यतिरिक्त फारसे काही झाले नाही.

# भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा : प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

## "राष्ट्र प्रथम" मंत्रासह भाजपाचा विस्तार – पक्षाच्या ४७व्या वर्षात प्रवेशानिमित्त प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रतिक्रिया"

पुणे (दै. संध्या) :

सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली. पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. सामान्य कार्यकर्ता ते पक्षाचा प्रदेशाध्यक्ष हा प्रवास फक्त भाजपसारख्या संघटनेतच शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, विचारधारेच्या घट्ट मुळांनी मातीत रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा विशाल वटवृक्ष आज ४७व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेले हे बीज आज सुमारे २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपूर्ण देशभर विस्तारले आहे. रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, भाजयुमोचा उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, कॅबिनेट मंत्री



आणि आता प्रदेशाध्यक्ष या नात्याने जेव्हा मी पक्षाच्या इतिहासाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवतं की जसे विचारधारेने एक एक कार्यकर्ते घडवले आणि त्याचप्रमाणे असंख्य ध्येयवादी कार्यकर्त्यांनी त्यांच्या रक्ता-घामाने गुरुदक्षिणा म्हणून पक्षाला घडवले. जेव्हा नेहरू-गांधींची अल्पसंख्याक-केंद्रित समाजवादी विचारसरणी आणि साम्यवादी चळवळींचा जागतिक प्रभाव होता, त्या काळात जनसंघाच्या माध्यमातून बहुसंख्य पण वंचित समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याचे आणि प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे धैर्य डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांसारख्या नेत्यांनी दाखवले. त्यांची दूरदृष्टी आजही आमच्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. वैचारिक पाया आणि नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या भाजपच्या या प्रवासात अनेक ऋषितुल्य नेत्यांचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र भाजपाचाच विचार करायचा झाला तर १९८० मध्ये उत्तमराव पाटील यांनी पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाचा पाया रचला. त्यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी पक्षाला गावागावात नेले आणि बहुजन व ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. १९९५ मध्ये काँग्रेसची सत्ता हटवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. प्रा. ना. स. फरांदे यांनी पक्षाला वैचारिक बळ दिले, तर सूर्यभान वहाडणे पाटील यांनी शिस्तबद्ध नेतृत्वातून संघटना मजबूत केली. भाऊसाहेब फुंडकर यांनी शेतकऱ्यांसाठी लढा देत पक्षाला शेतशिवारापर्यंत पोहोचवले. प्रमोद महाजन यांच्या निधनानंतर नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना सावरत संघटनेला नवी ऊर्जा दिली.

सुधीर मुनगंटीवार यांनी जनसंपर्काचा नवा अध्याय सुरू केला. २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने मोठी झेप घेतली आणि प्रदेशाध्यक्षपदावरून थेट मुख्यमंत्रीपदावर जाण्याचा अनोखा विक्रम घडला. त्यानंतर रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटना आणि सरकार यांच्यात उत्तम समन्वय साधत पक्षाला शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवले. कधी 'शेटजी-भटजी'ची पार्टी म्हणून टीका झालेल्या भाजपने ४६ वर्षांत महाराष्ट्रात ११ बहुजन समाजातील प्रदेशाध्यक्ष दिले, जे जातीय राजकारण करणाऱ्यांना ठोस उत्तर आहे. आज एक कार्यकर्ता म्हणून प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी सांभाळताना, मला अभिमान वाटतो की सामान्य कार्यकर्त्यापासून या पदापर्यंत पोहोचणे केवळ भाजपातच शक्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे केवळ आकडे नसून जनतेचा विश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले. भाजप ही केवळ बॅनर आणि सभांची संघटना नसून विचारधारेवर उभे असलेले कार्यकर्ते हीच तिची खरी ताकद आहे. 'भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हा विचार आम्ही तळागाळापर्यंत पोहोचवला आहे. आम्हाला अनेकदा अति राष्ट्रवादी म्हटले जाते; पण देशाबद्दल अभिमान बाळगणे हा दोष असेल, तर तो आम्ही आनंदाने स्वीकारू. 'राष्ट्र प्रथम'ही आमच्या विचारधारेची मूळ भूमिका आहे. काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करत भाजप एक 'टेक-फ्रेंडली' संघटना बनत आहे, ज्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांशी तात्काळ संपर्क साधणे शक्य झाले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

#### ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करणे, यावर विशेष भर दिला जात आहे. या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि गावपातळीवरील समस्या शासनापर्यंत नेणे, हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. हाच 'अंत्योदय'चा खरा अर्थ आहे. जेव्हा प्रत्येक भाजप कार्यकर्ता या भावनेने काम करेल, तेव्हाच 'विकसित भारत'चे स्वप्न साकार होईल आणि विकसित महाराष्ट्राशिवाय ते शक्य नाही.

## आदिवासी क्षेत्र व समुदायाच्या विस्तृत विकासावर भर द्या : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दै. संध्या) :

जिल्हाधिकारी यांनी मत्स्यव्यवसाय वृद्धिंगत करण्याकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या सहयोजनेतर्गत पुणे जिल्ह्यातील सन 2025-26 करिता प्राप्त परिपूर्ण प्रस्तावांस पुढील कार्यवाहीस्तव मंजुरी प्रदान केली आहे. या बैठकीस सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय पुणे, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव कार्यालयाचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी आदी उपस्थित होते. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय घटक वृद्धिंगत करण्याकरिता "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही सह-योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-1125/प्र. क्र.71/पदुम 14 दिनांक 4/9/2025 अन्वये मान्यता प्राप्त आहे.त्यानुषंगाने पुणे जिल्ह्यातील 6 तालुक्यातील 99 गावांतील आदिवासी क्षेत्रातील इच्छुक लाभार्थीकडून प्रस्ताव मागणीस्तव जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

## सागरी जीवन आणि समुद्राच्या निसर्गरम्य दृश्यांचे छायाचित्र व चित्रकला प्रदर्शन

पुणे (दै. संध्या) :

सागरी संघटना असलेल्या कंपनी ऑफ मास्टर मॅरिनर्स ऑफ इंडिया (सीएमएमआय), इन्स्टिट्यूट ऑफ मरीन इंजिनियर्स इंडिया (आयएमईआय) आणि इंडियन मॅरिटाइम फाउंडेशन (आयएमएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महा मॅरिनर्स असोसिएशन (एमएमए) आणि अमेझिंग नॉटिकल असोसिएशन (एएनए) यांच्या सहकार्याने कला रसिक आणि सागरी जीवनाची आवड असणाऱ्यांसाठी ५ ते ७ एप्रिल २०२६ दरम्यान पुण्यात एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन



जंगली महाराज रोडवरील बालगंधर्व कलादालन येथे सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत पाहता येईल. या प्रदर्शनाचे उदघाटन प्रमुख पाहुणे व्हाईस ॲडमिरल अनिल जग्गी एव्हीएसएम, कमांडंट एनडीए आणि शालिनी जग्गी यांच्या हस्ते झाले. या उपक्रमात सागरी क्षेत्राबाबत माहिती आणि या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करिअर बाबत मार्गदर्शनाचादेखील समावेश आहे. 'होरायझन्स अँड सीस्केप्स' या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनात सुमारे १२५ कलाकृतींचा समावेश असून, त्यात चित्रे आणि छायाचित्रांचा समावेश आहे. या कलाकृतींमधून समुद्राचे विविध पैलू आणि समुद्रावर प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या व्यक्तींच्या अनुभवातून उमटलेल्या सागरी जीवनाची दुर्मिळ झलक पाहायला मिळत आहे. या उपक्रमाचा उद्देश सागरी संस्कृती, सर्जनशीलता आणि खलाश्यांच्या वैयक्तिक अनुभव लोकांपर्यंत पोहचविणे हा आहे. दरवर्षी ५ एप्रिल रोजी नॅशनल मेरीटाईम डे साजरा करण्यात येतो. याचे अवचित्त साधून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आला आहे.

## जीवनशैलीशी निगडित आजारांमध्ये स्थूलता ही गंभीर बाब - तज्ज्ञ

पुणे (दै. संध्या) :

स्थूलतेचे दोन पैलू असतात, एक म्हणजे वजन आणि दुसरे आणि जास्त जोखिमकारक म्हणजे पोटाचा घेर. हा आशियाई लोकसंखेमध्ये जास्त दिसून येतो.आहार आणि व्यायाम, सक्रिय जीवनशैली ह्याचे महत्व लोकांपर्यंत सतत पोहचवणे परिणामकारक ठरू शकते.

मधुमेह, रक्तदाब पाठोपाठ स्थूलता असलेल्या लोकांच्या संख्येमध्ये होणारी झपाट्याने वाढ चिंताजनक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. सध्याच्या स्थितीत भारतात २४ टक्के महिला आणि २३ टक्के पुरुष हे स्थूल आहेत असा अंदाज आहे. (एनएफएचएस-5 (2019-21). वर्ल्ड ओबेसिटी ॲटलस अनुसार स्थूलतेच्या बाबतीत भारताचा क्रमांक जगात दुसरा आहे. हे भारतासमोरचे मोठे आव्हान आहे. लठ्ठपणा हा केवळ जीवनशैली निगडीत प्रश्न नसून आता एक वैद्यकीय स्थिती म्हणून ओळखला जात आहे.अलीकडेच आंतरराष्ट्रीय वैद्यकीय कोडिंग प्रणाली (आयसीडी) मध्ये लठ्ठपणाला औपचारिकपणे एक आजार म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्यदिनानिमित्त सर्वांगीण आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली जाते. यावर्षीची संकल्पना ही हेल्थ फॉर ऑल - स्टँड बाय सायन्स ही आहे. त्याअर्थाने स्थूलता हा विषय केंद्रस्थानी घेऊन चांगल्या आरोग्यासाठी चांगली जीवनशैली आणि नियंत्रणात असलेले वजन आणि स्थूलता हा आजार झाल्यास शास्त्रीय उपचार याबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मधील स्थूलता आणि बेरियाट्रिक तज्ज्ञ डॉ. परमेश्वर बंबरुळे म्हणाले की स्थूलता असणाऱ्या लोकांमध्ये झपाट्याने वाढ होत असून ही गंभीर बाब आहे.लठ्ठपणावर उपचार न केल्यास मधुमेह,उच्च रक्तदाब,हृदयरोग,चयापचयाचे विकार आणि इतर अनेक गुंतागुंत होऊ शकतात. तब्बल २३० समस्या निर्माण होण्यास स्थूलता जोखिमकारक ठरू शकते.लवकर निदान आणि शास्त्रीय उपचार हे या गुंतागुंतींची जोखीम लक्षणीयरित्या कमी करू शकतात आणि जीवनमान उंचावू शकतात. ते पुढे म्हणाले की जसे वय वाढत जाते तसे चयापचय प्रणाली मंदावते, स्नायूंमध्ये झीज / कमकुवतपणा सुरू होते . त्यामुळे आहार तोच असताना लठ्ठपणा का वाढत आहे असा अनेकांना प्रश्न पडतो. अजून एक कारण म्हणजे आपल्या आहारात कार्बनयुक्त पदार्थ जास्त आणि प्रथिनयुक्त पदार्थ कमी असतात. विशेष करून वयाच्या तिशीनंतर याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. लठ्ठपणाला आता वैद्यकीय स्थिती म्हणून ओळख मिळाली आहे. लठ्ठपणाच्या मुळाशी जाणे महत्त्वाचे आहे. व्यायाम आणि आहाराच्या माध्यमातून नियंत्रण, पुढच्या टप्प्यात आजार असल्यास वैद्यकीय व्यवस्थापनाची गरज पडू शकते.

## पुण्यात क्रिएटिव्ह आर्ट अफेअर्सचे भव्य कला प्रदर्शन

पुणे (दै. संध्या) :

क्रिएटिव्ह आर्ट अफेअर्सतर्फे 'नवोन्मेषाचा उत्सव' या संकल्पनेवर आधारित 'क्रिएटिव्ह लिव्हज XII' हे समूह प्रदर्शन आणि अम्ब. डॉ. (एच. सी.) संजय मौर्य यांचे 'रिफ्लेक्शन्स ऑफ लाईफ ऑन कॅनव्हास' हे एकल प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या कला प्रदर्शनातून विविध कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि सामाजिक भानाचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे. या प्रदर्शनामध्ये पाहुण्या कलाकार रंजना कश्यप आणि अमिता चक्रवर्ती यांच्या उत्कृष्ट कलाकृतींसह क्रिएटिव्ह आर्ट अफेअर्स टीममधील डॉ. स्मिता बागवाडे, संध्या साळुंके, राजिंदर कुमार पोन्ना आणि अनिंदिता रे यांच्या कलाकृतीही प्रदर्शित केल्या जाणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून जागतिक ख्यातीचे बहुविद्याशाखीय कलाकार अम्ब. डॉ. (एच.सी.) संजय मौर्य यांचे चौथे एकल प्रदर्शन 'रिफ्लेक्शन्स ऑफ लाईफ ऑन कॅनव्हास' सादर होणार आहे. त्यांच्या कलाकृतींमधून जीवनातील विविध पैलूंचे प्रभावी चित्रण अनुभवायला मिळणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून कलाकार सामाजिक समस्यांवर भाष्य करत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

# १,००० विद्यार्थ्यांपर्यंत एआय आणि कोडिंगची कौशल्ये पोहोचवली

## सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस अंतर्गत भविष्यवेधी तंत्रज्ञान कौशल्यांमध्ये प्रमाणित झालेले विद्यार्थी

पुणे (दै. संध्या) :

भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड असलेल्या सॅमसंगने, आपल्या प्रमुख 'CSR' (सामाजिक उत्तरदायित्व) उपक्रमांतर्गत – 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस' (SIC) द्वारे – महाराष्ट्रातील १,००० विद्यार्थ्यांना प्रमाणित केले आहे. राज्याची डिजिटल कौशल्य परिसंस्था बळकट करण्याच्या आणि सरकारच्या राष्ट्रीय कौशल्य विकासाच्या उद्दिष्टांना पुढे नेण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

हा टप्पा म्हणजे राज्यात 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस'ने हाती घेतलेला पहिलाच मोठ्या प्रमाणावरील प्रमाणीकरण उपक्रम देखील आहे; ज्या अंतर्गत विद्यार्थ्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेचे दोन अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ असलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) आणि 'कोडिंग व प्रोग्रामिंग' या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे (SPPU) १२७, पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे ३७३, डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या




'रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'चे २५० आणि 'अंजुमन-इ-इस्लाम'च्या 'कालसेकर टेक्निकल कॅम्पस'चे २५० विद्यार्थी—अशा एकूण विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. याद्वारे त्यांनी प्रत्यक्ष जगातील आव्हाने सोडवण्यासाठी उपयुक्त ठरणारी, उद्योगांच्या गरजांशी सुसंगत अशी व्यावहारिक कौशल्ये आत्मसात केली आहेत.

या तांत्रिक पायावर उभारलेला हा कार्यक्रम 'सॉफ्ट स्किल्स'चे प्रशिक्षण आणि करिअर-सज्जतेचे घटक (मॉड्यूल्स) यांचा समावेश करतो; ज्यामुळे विद्यार्थी केवळ नोकरीसाठीच नव्हे, तर भविष्यासाठीही पूर्णपणे सज्ज होतील याची खात्री केली जाते. हा सर्वसमावेशक दृष्टिकोन शैक्षणिक शिक्षण आणि उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा यांमधील दरी सांधण्यावर सॅमसंगने दिलेल्या भरला अधोरेखित करतो. भारतात ३० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, शिक्षण आणि डिजिटल समावेशकता यांना चालना देण्याच्या आपल्या कटिबद्धतेस सॅमसंग सातत्याने अधिक बळ देत आहे.

"भारताच्या डिजिटल विकासाची गाथा अखेरीस येथील कुशल मनुष्यबळाच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल. जसजसे एआय (AI) सारखे तंत्रज्ञान उद्योगांच्या परिघावरून केंद्रस्थानी येत आहे, तसतसे कौशल्य विकास हा केवळ मूलभूत प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता, प्रत्यक्ष वापरातील क्षमता निर्माण करण्याकडे विकसित झाला पाहिजे. सॅमसंगमध्ये, आम्ही 'इनोव्हेशन कॅम्पस'सारख्या कार्यक्रमांना केवळ शैक्षणिक उपक्रम म्हणून पाहत नाही, तर सखोल तंत्रज्ञान शिक्षणाला रोजगारक्षमता आणि समस्या-निवारण कौशल्यांशी जोडणारे हे अंतर भरून काढणारे व्यासपीठ म्हणून पाहतो. महाराष्ट्रातील हा महत्त्वाचा टप्पा दर्शवतो की, उद्योग आणि शिक्षण क्षेत्र एकत्र येऊन जागतिक स्तरावर स्पर्धात्मक तसेच स्थानिक पातळीवर सुसंगत असे भविष्य-सज्ज मनुष्यबळ कसे तयार करू शकतात," असे सॅमसंग दक्षिण-पश्चिम आशियाचे सीएसआर आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स प्रमुख, शुभम मुखर्जी म्हणाले.

२०२२ मध्ये भारतात सुरू करण्यात आलेला 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस' हा उपक्रम, वर्गातील शिक्षणाची सांगड मार्गदर्शनासह आणि प्रकल्पांवर आधारित प्रत्यक्ष उपयोगाशी घालून, भविष्यातील तंत्रज्ञानाचे शिक्षण सर्वांसाठी सुलभ करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा विस्तार जसजसा होत आहे, तसतसा तो विविध प्रदेशांतील तरुणांना—भारताच्या डिजिटल विकासाच्या गाथेत सहभागी होण्यासाठी आणि तिला आकार देण्यासाठी—आवश्यक असलेली साधने व आत्मविश्वास देऊन सक्षम करण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. या दृष्टीकोनाशी सुसंगत राहून, 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस' संपूर्ण भारतात वेगाने विस्तारत आहे; तसेच, त्यांनी २०२५ सालापर्यंत २०,००० तरुणांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्टही साध्य केले आहे. सॅमसंगच्या या प्रमुख 'CSR' (सामाजिक उत्तरदायित्व) उपक्रमामध्ये राष्ट्रीय स्तरावर ४८% महिलांचा सहभाग नोंदवला गेला आहे, जो सर्वसमावेशक आणि न्याय्य तंत्रज्ञान परिसंस्था उभारण्याप्रती सॅमसंगची कटिबद्धता अधोरेखित करतो.

### पर्यावरप्रेमींनी व्यक्त केला रोष

नागपूर (दै. संध्या) : प्रस्ताविक अमरावती-परतवाडा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी अडथळा ठरणारी शंभराहून अधिक शंभर-सव्वाशे वर्षे जुनी झाडे अखेर तोडण्यात आली. उल्लेखनीय म्हणजे न्यायालयाने या मार्गाच्या दुतर्फा असलेली जुनी झाडे तोडू नये असे आदेश दिले होते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने या आदेशाची पायमल्ली केल्याचा आरोप पर्यावरण कार्यकर्त्यांनी केला आहे.

**MAHAVITARAN** — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Executive Engineer, Rastapeth Testing Division, MSEDCL, Administrative Building, Rasta Peth, Pune 411011 invites Tenders from e-registered firms with MSEDCL for Providing Housekeeping works to upkeep the NABL lab and its premises at Phursungi, Pune .Details are as below:

| Tender No. | Scope of Work | Tender Amount |
|---|---|---|
| EE/RPTD/ TQA/T-01/ 2026-27 | Tender for Providing Housekeeping works to upkeep the NABL lab and its premises at Phursungi, Pune | RS.2.60 LAKHS (INCLUDING GST) |

Bid documents are available on our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ from 07.04.2026 to 21.04.2026 up to 17.00 hrs . Contact Mobile 7875767025.

PRO/PZ/004/2026-27

Executive Engineer,
Rastapeth Testing Division, MSEDCL, Pune

**ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे**

**निविदा नोटीस**

ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे नारायणगाव खालील कामांची बंद लिफाफ्यामध्ये पुणे जिल्हा परिषद पूर्ण व योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून (२) पाकिटे) पद्धतीने निविदा मागवीत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे नारायणगाव याजकडून दि. ०८-०४-२०२६ पासून १५-०४-२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ३ वाजेपर्यंत देण्यात येतील व भरून पाठवलेल्या मोहोरबद निविदा दि. १५-०४-२०२६ रोजी दुपारी ३ वा पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव तर्फे नारायणगाव मध्ये स्विकारल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पिंपळगाव तर्फे नारायणगाव गावठाण मध्ये सांडपाणी व्यवस्थापन करणे | ३,८५,४१५/- | सूट | २०० | ६ महिने |

टीप : १) कोणत्याही निविदा/दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा काम रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती ई. बाबतचा सर्व तपशील ग्रामपंचायत कार्यालय येथे पहावयास मिळेल. ३) निविदा फी रक्कम ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे नारायणगाव येथे रोख स्वरुपात भरणा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे


## थोडक्यात पण महत्वाचे...



## पिंपरीत जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; 7 जणांवर गुन्हा दाखल

पिंपरी (दैनिक संध्या) : संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरू असलेल्या जुगार अड्डयावर पोलिसांनी धाड टाकत सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ४ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नवीन फुलेनगर परिसरातील मोकळ्या मैदानात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे आर्थिक फायद्यासाठी एकत्र येऊन पैशांवर जुगार खेळत होते. याची गुप्त माहिती मिळताच संत तुकारामनगर पोलिस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाड टाकून त्यांना रंगेहाथ पकडले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये प्रतिक बाळकृष्ण बगाटे (वय २८ रा. विठ्ठल नगर पिंपरी), अमित दिलीप गायकवाड (वय २७, या. शनी मंदिर चौक संत तुकाराम नगर), किरण मारुती कांबळे (वय ३८, रा. विठ्ठल नगर पिंपरी), पंकज भगवान ओव्हाळ (वय ३४, या. विठ्ठल नगर पिंपरी), दत्ता रवी हजारे (वय २२, विठ्ठल नगर पत्राशेड पिंपरी), रोहित प्रभाकर शिंदे (वय २५, या. विठ्ठल नगर पिंपरी) आणि सूरज विजय घोडके (वय ३४, रा. विठ्ठल नगर पत्रा शेड पिंपरी) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून जुगाराचे साहित्य जप्त केले असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार व्यवसायावर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## बास्केटबॉलचा खांब अंगावर पडल्याने विद्यार्थ्याचा मृत्यू



पिंपरी (दैनिक संध्या) : बास्केटबॉल खेळताना लोखंडी अंगावर खांब कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.५) सकाळी सात वाजताच्या सुमारास मावळ तालुक्यातील इंदोरी येथे तळेगाव-चाकण रस्त्यावरील तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूटच्या आवारात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल वर्मा (वय २०, तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूट विद्यार्थी वसतिगृह, इंदोरी, ता. मावळ, पुणे. मूळ रा. आयोध्या, उत्तर प्रदेश) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. तोलानी इन्स्टिट्यूटच्या आवारात विद्यार्थी बास्केटबॉल खेळत होते. दरम्यान, विशाल हा बास्केटबॉल रिंगला लटकला असता रिंग तुटली आणि त्यापाठोपाठ लोखंडी खांबदेखील खाली पडला. लोखंडी खांब अंगावर पडल्याने विशाल गंभीर जखमी झाला. तत्काळ उपचारासाठी त्याला तळेगाव दाभाडे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.



## वाकडमध्ये आमदार शंकर जगताप यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा

■ नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या पुढाकारातून बांधकाम कामगारांना गृहउपयोगी वस्तू, सुरक्षा संचचे मोफत वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरात समाजोपयोगी उपक्रम राबवून अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात पार पडला. प्रभाग क्रमांक २५ मधील गरजू बांधकाम कामगारांसाठी कामगार कल्याण मंडळाच्या वतीने तसेच नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या पुढाकारातून गृहउपयोगी वस्तू, अत्यावश्यक संच आणि सुरक्षा संच यांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक राहुल कलाटे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, रिपाईच्या महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, नगरसेविका स्नेहा कलाटे, रेश्मा भुजबळ, आरती चोंधे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच साम्राट जकाते, सिकंदर सूर्यवंशी, विनोद चांदमारे, विलास पाटील, विशाल वाव्हळकर, आशिष थोरात, संतोष डेंगळे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत सुमारे १२५ गरजू कुटुंबांना साहित्याचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी कुणाल वाव्हळकर यांच्या समाजाप्रती असलेल्या निष्ठेचे आणि कार्यतत्परतेचे कौतुक केले. यावेळी राहुल कलाटे म्हणाले की, "नगरसेवक झाल्यानंतरही कुणाल वाव्हळकर यांची समाजाशी असलेली नाळ तुटलेली नाही. सर्वसामान्यांच्या आनंदात रमणे हेच खरे मोठे पद आहे." त्यांनी पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देत आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित उपक्रमाचे विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपणारा हा कार्यक्रम ठरला आहे.

## सांगवी-दापोडी रस्त्यावर बेवारस वाहनांचा अडथळा; नागरिक संतप्त

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : जुनी सांगवी येथील पवना नदी किनाऱ्यालगतचा सांगवी ते दापोडी मुख्य रस्ता बेवारस गंजलेल्या आणि धूळ खात पडलेल्या वाहनांच्या विळख्यात अडकला आहे. यामुळे रस्ता वाहतुकीस अरुंद होऊन वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रस्त्याच्या कडेला स्कूटर, मोटारसायकली चारचाकी वाहने तसेच ऑटो रिक्षा अनेक दिवसांपासून उभी असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. परंतु महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जुनी सांगवी हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून, दिवसभर दुचाकी आणि चारचाकी वाहनांची रेलचेल असते. त्यातच परिसरात रस्त्याच्या कडेला असलेल्या उद्यानामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची सतत ये-जा सुरू असते. मात्र, रस्त्याच्या कडेला उभी असलेली ही बेवारस वाहने पदपथ आणि रस्त्याची जागा अडवत असल्याने पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. या बेवारस वाहनांमुळे एखादा मोठा अपघात घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून ही वाहने हटविल्यास रस्ते मोकळे होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल.

# आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त १००० वृक्षांचे वाटप



**पिंपळे सौदागर (दै. संध्या)**

चिंचवड विधानसभेचे कार्य सम्राट आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने पर्यावरणपूरक असा अभिनव व समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पिंपळे सौदागर परिसरात नागरिकांना १००० वृक्षांचे मोफत वाटप करण्यात आले.

वाढदिवसाचे औचित्य साधत समाजासाठी काहीतरी सकारात्मक व शाश्वत योगदान देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमातून "एक व्यक्ती – एक वृक्ष" ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात आली. वाढत्या नागरीकरणामुळे कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमाबाबत प्रतिक्रिया देताना उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे म्हणाले की, "आमदार शंकर भाऊ जगताप हे केवळ लोकप्रतिनिधी नसून जनतेच्या प्रत्येक प्रश्नासाठी सातत्याने झटणारे कार्यसम्राट आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीत समाजहिताला नेहमीच प्राधान्य असते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही वृक्ष वाटपासारखा उपक्रम राबवून त्यांच्या कार्याला साजेसा आणि समाजासाठी उपयुक्त संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

आज लावलेला प्रत्येक वृक्ष हा भविष्यातील पर्यावरणाचा मजबूत पाया ठरेल." तसेच उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. कुंदा संजय भिसे यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले की, "आमदार शंकर जगताप यांची काम करण्याची धडाडी, जनसंपर्क आणि विकासाभिमुख दृष्टी ही खरोखर प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली चिंचवड विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांना गती मिळाली आहे. त्यांच्याच प्रेरणेतून आम्ही हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविला.

शहराचा विकास करताना पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज आहे, आणि अशा उपक्रमांमधून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे."

या उपक्रमाद्वारे आमदार शंकर जगताप यांना 'निसर्ग आरोग्यदायी शुभेच्छा' देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश व्यापक स्वरूपात समाजात पोहोचविण्यात आला. सदर उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पर्यावरण रक्षणाच्या दिशेने उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. याप्रसंगी उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे, उन्नती फाउंडेशन सभासद, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन, लिनियर गार्डन जेष्ठ नागरिक संघ, आनंद हास्य क्लब, विठाई वाचनालय, यांच्यासह पिंपळे सौदागर , रहाटणी मधील विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपरीत रक्ताचा तुटवडा; वाढत्या मागणीमुळे रुग्णालये अडचणीत

**पिंपरी (दै. संध्या)**

गेल्या काही वर्षांत शहराचा वाढलेला विस्तार आणि लोकसंख्या; तसेच वाढलेली रुग्णसंख्येमुळे रक्ताची गरजही वाढली आहे. मात्र, त्या तुलनेत रक्तदाते मिळत नसल्याने रक्तपढ्यांत रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. शहरात सुमारे 8 ते 10 रक्तपेढ्या आहेत. यातून शहरातील विविध रुग्णालयांना मागणीनुसार रक्तपुरवठा करण्यात येतो. रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा कमी झाला आहे. कर्करोग, डेंगूच्या रुग्णांची वाढती संख्या आणि शस्त्रक्रियांसाठी रक्ताची मागणी वाढली आहे. रक्तपेढ्या आणि रुग्णालये रक्तदात्यांच्या शोधात आहेत. त्यामुळे नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन रक्तपेढ्यांकडून केले जात आहे. सध्या परीक्षांचा कालावधी आहे. त्यानंतर एप्रिलच्या अखेर आणि मे महिन्यात सुट्यांच्या कालावधीत रक्तदान शिबिरे कमी घेतली जातात. त्यामुळे शिबिराअभावी रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. पुढील काही दिवस पुरेल इतकाच साठा रक्तपेढ्यांमध्ये उपलब्ध असल्याने तुटवडा वाढण्याच्या भीतीने रुग्णालयांसह रक्तपेढ्यांनी दात्यांचा शोध सुरू केला आहे.

## औंधमध्ये १२ एप्रिल रोजी होणार माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा

**औंध (दै. संध्या)**




जनता शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, औंध येथील SSC 2002-2003 व HSC बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा रविवार, दिनांक 12 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत शाळेच्या प्रांगणात पार पडणार असून, माजी विद्यार्थी, शिक्षकवर्ग व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीकडून करण्यात आले आहे.

या स्नेहमेळाव्याचा मुख्य उद्देश जुन्या आठवणींना उजाळा देणे, शालेय जीवनातील मित्र-मैत्रिणींना पुन्हा एकत्र आणणे आणि शाळेशी असलेले नाते अधिक दृढ करणे हा आहे. कार्यक्रमात दीपप्रज्वलन, स्वागत समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिक्षकांचा सत्कार तसेच माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यासोबतच, या मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी योगदान देण्याचा उपक्रम हाती घेतला असून, विविध शैक्षणिक व पायाभूत सुविधा उभारण्याबाबतही चर्चा होणार आहे. आयोजक समितीने अल्पावधीतच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यात यश मिळवले असून, सर्व समित्या समन्वयाने कार्यरत आहेत. त्यामुळे हा मेळावा उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

"हा कार्यक्रम केवळ स्नेहमेळावा नसून, जुन्या मैत्रीचा, आठवणींचा आणि शाळेशी असलेल्या भावनिक नात्याचा उत्सव आहे," असे आयोजकांनी सांगितले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इतिहास हा माणसाला जागृत करत असतो - श्रीकांत चौगुले

**पिंपरी (दै. संध्या)**



इतिहास हा माणसाला जागृत करत असतो. कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासामध्ये बऱ्या-वाईट गोष्टी असतात. इतिहास लिहिताना बऱ्या-वाईट गोष्टींचा उल्लेख केला नाही तर चांगल्या बाबीचे महत्व अधोरेखीत होऊ शकत नाही.

पूर्व काळी कोणाचे साम्राज्य होते. घडलेल्या घटनांचा इतिहास असतो. दिल्लीत कोणाचे साम्राज्य होते. विजयनगर साम्राज्य, मुघल साम्राज्य, शिवकाळ, पेशवेकाळ, त्यानंतर ब्रिटीश राजवट, अशा सर्व घटनांचा उल्लेख येतो. या सर्व घटनांचा उल्लेख राजेशिर्के घराण्याचा कुलवृत्तांत या पुस्तकात केलेला दिसून येतो. असे मौलिक विचार ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते श्रीकांत चौगुले यांनी व्यक्त केले.

महासम्राज्ञी येसूबाई प्रतिष्ठान आणि पवनेचा प्रवाह यांच्या संयुक्त विद्यमाने महासम्राज्ञी येसूबाई स्मृति पुरस्कार-२०२६ क्रीडापटू सौ. गायत्री सचिन कळंबे यांना प्रदान करण्यात आला तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ऐतिहासिक घराण्यातील वंशजांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते, श्रीकांत चौगुले, कमाउंट-दीपकराव त्रिबंकराव राजेशिर्के (पाटील) दीपकराजे गणपत राजेशिर्के, शिरकोली ग्रापंचायत सरपंच अमोल पडवळ, पत्रकार-विनायक गायकवाड, भिमराव चरखडे, शिरकाई देवीचे भक्त-भाविक, शिरकोलीतील ग्रामस्थ बहुसंखेने उपस्थीत होते. पुढे चौगुले म्हणाले की, राजेशिर्के हे शूर, लढवय्ये होते, त्यांनी परकियांना अनेक शतके घाटाखाली येऊ दिले नाही. छ. शिवाजी महाराजांना स्वराज्याच्या कामी राजेशिर्के घराण्याची फार मोठी मदत झालेली आहे. छ. शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊ ह्या देखिल शिरकाई देवीचे दर्शन घेऊन चोळी-बांगडी करण्यासाठी जुन्नरच्या शिवनेरीहून नित्यनियमाने येत असत असे श्रीकांत चौगुले यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. दीपकराजे राजेशिर्के म्हणाले, शिवाजीराव शिर्के यांनी लिहिलेल्या राजेशिर्के घराण्याचा कुलवृतांत, या पुस्तकामुळे देशातील सर्व राजेशिर्के घराण्यातील मंडळी एकत्र येऊन संघटीत झालीत. अन्यायाविरूध्द प्रतिकार करू लागली आहेत. त्यांनी पुस्तकाच्या माध्यमातून असंख्य मंडळींना हे पुस्तक देऊन स्वराज्याची व इतिहासाची जाण आणि आवड निर्माण केली आहे.

शिवाजीराव अ. शिर्के हे शांत स्वभावाचे, अभ्यासू, संशोधक-संपादक आहेत, त्यांनी लिहिलेले राजेशिर्के घराण्याचा कुलवृतांत, या पुस्तकामुळे प्राचीन काळचा इतिहास कलला आहे. तो भावी पिढीपर्यंत अर्थात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. ८ वी ते १० वी च्या पाठ्यपुस्तकामध्ये यातील काही संदर्भ घेणे अत्याआवश्यक आहेत असे मत सुरेश मुरलीधर कंक यांनी व्यक्त केले. प्रस्ताविक व सुत्रसंचालन शिवाजीराव अ. शिर्के यांनी केले. तर आभार सचिन कळंबे यांनी मानले.

## देहूरोडमध्ये ज्वेलर्सने घातला अनेकांना गंडा

**देहूरोड (दै. संध्या)**




देहूरोड परिसरात एका ज्वेलर्स व्यावसायिकाकडून मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सोन्याचे दागिने रिपेअरिंग व नवीन दागिने तयार करून देण्याच्या बहाण्याने तब्बल २६ लाख ६० हजार रुपयांची आणि ६५७ ग्रॅम सोन्याची फसवणूक करण्यात आली आहे. देहूरोड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १ जानेवारी २०२६ ते ३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सुभाष चौक, मेन बाजार येथील 'सुंधा ज्वेलर्स' येथे घडली. या प्रकरणी ४६ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली आहे. अंबालाल जिवाजी सोनी (वय अंदाजे ५६) आणि रोहित अंबालाल सोनी (वय अंदाजे ३०, रा. विकासनगर, किवळे, पुणे) अशी आरोपींची नावे आहेत. फिर्यादी तसेच इतर नागरिकांनी आरोपींवर विश्वास ठेवून दागिने दुरुस्तीसाठी, नवीन दागिने तयार करण्यासाठी तसेच रोख रक्कम दिली होती. मात्र, आरोपींनी हे सर्व दागिने व पैसे परत न देता दुकान बंद करून पलायन केले. या फसवणुकीत फिर्यादीसह सुमारे ४० हून अधिक नागरिकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

## हिंजवडी मेट्रो मार्ग-3 साठी ५,५०० झाडांची लागवड

**पिंपरी (दै. संध्या)**

हिंजवडी आयटी पार्कमधील महत्त्वाचा सार्वजनिक वाहतुकीचा दुवा ठरणारा 'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्ग-3' प्रकल्प लवकरच कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनालाही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) प्राधान्य दिले आहे. या प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या जवळपास 1 हजार 305 झाडांच्या बदलत्यात 5 हजार 500 नव्याने झाडांचे रोपण केले आहे. या नव्याने लावलेल्या वृक्षांचे जगण्याचे प्रमाण 100 टक्के असल्याचे पीएमआरडीएकडून सांगण्यात आले. मेट्रो मार्गावरील खांब (पियर्स), स्थानके आणि जिन्यांच्या उभारणीमध्ये मार्गावरील विविध ठिकाणांची झाडे बाधित झाली होती. पीएमआरडीएने पर्यावरणपूरक भूमिका घेत यापैकी केवळ 557 झाडे तोडली, तर उर्वरित 748 झाडांचे सुरक्षितरीत्या पुनर्रोपण केले. तसेच, पर्यावरणाची हानी भरून काढण्यासाठी तब्बल 5,500 नवीन झाडे लावण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ही नवीन झाडे पशुसंवर्धन विभाग, ताथवडे येथील कास्टिंग यार्ड, बावधनचे एनडीए वनक्षेत्र, एनसीएल, पंचवटी, हिंजवडी फेज-3 मधील एमआयडीसी प्लॉट, राजभवन आणि कृषी महाविद्यालय यांसारख्या शहराच्या विविध भागांत लावण्यात आली आहेत.

## यशवंत नगर जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण

**तळेगाव दाभाडे (दै. संध्या)**





तळेगाव दाभाडे येथे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येला अखेर मोठा दिलासा मिळाला असून, नगरपरिषदेच्या माध्यमातून यशवंत नगर येथे ३ एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण आज उत्साहात संपन्न झाले.

आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे स्टेशन परिसरातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नगरपरिषदेच्या सुमारे १ कोटी ३५ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सत्यकमल कॉलनी, म्हाडा कॉलनी, रेनो कॉलनी, स्टेशन चौक आणि यशवंत नगर परिसरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम होणार असून चौराई येथील मुख्य जलशुद्धीकरण प्रकल्पावरील ताणही कमी होणार आहे.

स्टेशन भागातील नागरिकांना पाण्यासाठी दररोज करावी लागणारी कसरत लक्षात घेऊन हा प्रकल्प साकारण्यात आला असल्याचे सांगताना आमदार शेळके यांनी नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देण्याचा आपला संकल्प पुन्हा अधोरेखित केला. तसेच तळेगाव स्टेशन परिसरासाठी आंद्रा धरणातून बंदिस्त पाईपलाईन योजनेला अंतिम टप्प्यात मंजुरी मिळत असून, लवकरच या योजनेची कामेही सुरू होणार असल्याने भविष्यात पाणीटंचाईचा प्रश्न पूर्णतः मार्गी लागणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला पाणीप्रश्न सुटल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत आमदार सुनील शेळके यांचे आभार मानले. या लोकार्पण सोहळ्यास नगराध्यक्ष संतोषभाऊ दाभाडे, सुरेशभाऊ चौधरी, नाना कारके, दर्शनदादा खांडगे, गणेशजी काकडे, सुरेशजी धोत्रे, इंदरजी ओसवाल यांसह नगरसेवक व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## मावळ बाजार समितीत राष्ट्रवादीला धक्का; भाजपचा सभापती

**पक्षातील फुटीमुळे सत्ता गमावली; आमदार शेळके यांचा राजीनाम्याचा इशारा**

**वडगाव मावळ (दै. संध्या)**

मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, उपसभापती पदासाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीची सहा मते फुटली आणि राष्ट्रवादीची एकहाती सत्ता असताना भाजपचे सुभाषराव जाधव हे सभापती झाले. यामुळे मावळात सगळीकडे बोलबाला असलेल्या राष्ट्रवादीवर नामुष्कीची वेळ आली असून हा पराभव गांभीर्याने घेत आमदार सुनील शेळके यांनी थेट पक्षाच्या संचालकांना राजीनामे देण्याचे आदेश दिले असून राजीनामे न दिल्यास पक्षातून हकालपट्टी करणार असून पुन्हा या सर्वांसाठी माझे दरवाजे बंद असा सणसणीत इशारा दिल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 18 जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे 12 व काँग्रेसचा (आय) 1 असे 13 चे स्पष्ट बहुमत असून भाजपचे अवघे 5 सदस्य आहेत. असे असताना नुकत्याच झालेल्या बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुभाषराव जाधव यांना 11 मते मिळाली तर राष्ट्रवादीचे उमेदवार विक्रम कलावडे यांना 5 मते मिळाली. त्यामुळे राष्ट्रवादीची 6 मते फुटल्याने उघड झाले.

एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पक्षातीलच फुटीरांमुळे पराभव पत्करावा लागला. त्यामुळे राष्ट्रवादीवर नामुष्कीची वेळ आली असून या पार्श्वभूमीवर आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी बाजार समितीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांची तातडीची बैठक घेऊन सर्व सदस्यांनी सोमवारी राजीनामे द्यावेत असा आदेश दिला व राजीनामे न दिल्यास हकालपट्टी करण्याचा इशाराही दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खंडेरायाला वातानुकूलित यंत्र अर्पण

मंचर (दैनिक संध्या) : धामणी (तालुका आंबेगांव) येथील कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात चैत्र पौर्णिमेला(२एप्रिल २६)वाळूंजनगर (लोणी) येथील भाविक श्रीकांत अर्जुन वाळूंज.पा. यांनी वातानुकूलित यंत्र (ए.सी.)अर्पण केला असल्याचे सेवेकरी मंडळीनी सांगितले. देवस्थानाच्या मुख्य गाभाऱ्यातील हवेचे तापमान आणि आर्द्रता नियंत्रीत करण्यासाठी व खंडोबाचे दर्शनासाठी येणाऱ्या शेकडो भाविकांचे सुविधेसाठी प्रख्यात गोदरेज कंपनीचा ए.सी.(Air conditioner)खंडेरायाला अर्पण केला असल्याचे सांगण्यात आले यावेळी ग्रामस्थ व सेवेकऱ्यांनी श्रीकांत वाळूंज यांचा सत्कार केला.यावेळी सेवेकरी दादाभाऊ भगत.प्रभाकर तांबे.सुभाष तांबे.नामदेव भगत.अनिरुध्द वाळूंज.तिर्थराज लोंखडे.चेतन सिनलकर.उपस्थित होते.

### मतदारांसाठी 'ईसीआयनेट'ची सोय; उमेदवारांची सविस्तर माहिती एका क्लिकवर

पुणे (दैनिक संध्या) : बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना उमेदवारांविषयी सविस्तर व पारदर्शक माहिती सहज उपलब्ध करून देण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'ईसीआयनेट' या एकात्मिक डिजिटल व्यासपीठाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून मतदारांना उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता व दायित्वे, शैक्षणिक पात्रता तसेच अधिकृत सामाजिक माध्यमांवरील खात्यांची माहिती 'आपला उमेदवार जाणून घ्या' या घटकाद्वारे पाहता येणार आहे. मतदारांना ईसीआयनेटमधील "निवडणूक प्रक्रिया" या विभागांतर्गत हा घटक सहज उपलब्ध असून, त्याद्वारे उमेदवारांनी सादर केलेले संपूर्ण प्रतिज्ञापत्र (फॉर्म २६) देखील उतरवता येणार आहे. यामुळे मतदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होणार आहे. ईसीआयनेट हे जगातील सर्वात मोठे निवडणूक सेवा व्यासपीठ असून, भारतातील निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ४० हून अधिक ॲप्स व संकेतस्थळे एकत्रित करून एकसंध डिजिटल अनुभव देण्यात आला आहे. या व्यासपीठाद्वारे मतदार नोंदणी, मतदार यादी शोध, अर्जाची स्थिती पाहणे, निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद, ई-मतदार ओळखपत्र डाउनलोड, मतदानाचे प्रवाह तसेच तक्रार निवारण यांसारख्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत. याशिवाय, ईसीआयनेटवर 'सी-सिव्हिजल' या ॲपद्वारे आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नोंदविता येतात, तर 'सक्षम' उपक्रमाद्वारे दिव्यांग मतदारांसाठी सुलभ सेवा पुरविण्यात येत आहेत. या सर्व सुविधा एकाच सुरक्षित व्यासपीठावर उपलब्ध असल्याने मतदारांना तत्काळ माहिती व तक्रार निवारणाची प्रभावी सोय मिळत आहे. बारामती पोटनिवडणुकीत पारदर्शक, सुजाण आणि सक्रिय मतदानासाठी मतदारांनी ईसीआयनेटचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

### आदर्शगाव गावडेवाडी येथील भीषण आगीत शेतमजुराच्या संसाराची राख

मंचर (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्यातील आदर्शगाव गावडेवाडी येथील वनदेव वस्तीमध्ये सोमवारी (ता. ६) दुपारी लागलेल्या भीषण आगीत शेतमजूर राहुल सिताराम खंडागळे यांचा संसार अक्षरशः राख झाला. या आगीत सहा लाख रुपयांचे नुकसान झाले असून कुटुंबीय बेघर झाले आहेत. श्री भैरवनाथ यात्रा उत्सवानिमित्त बैलगाडा शर्यती पाहण्यासाठी खंडागळे कुटुंबीय गावात गेले होते. त्यामुळे घरात कोणीही नसताना अचानक झोपडीला आग लागली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले; मात्र कडक ऊन आणि वाऱ्यामुळे अवघ्या दहा मिनिटांत संपूर्ण झोपडी जळून खाक झाली. या आगीत झोपडीसह लहान-मोठ्या १२ शेळ्या, धान्यसाठा, तांदूळ, भुईमुगाच्या शेंगांची पोती, शेती फवारणी पंप, शालेय पुस्तके, संसारोपयोगी वस्तू तसेच ६० हजार रुपयांची रोख रक्कम जळून नष्ट झाली. यात्रा व कौटुंबिक कारणासाठी बँकेतून काढून आणलेली ही रक्कमही आगीत भस्मसात झाली. घटनेनंतर कुटुंबीय घटनास्थळी आल्यानंतर महिलांसह लहान मुलांना रडू कोसळले. या दुर्घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी तत्काळ पुढाकार घेत अर्ध्या तासात ४५ हजार रुपयांची मदत उभी केली. नुकसानीचा पंचनामा अवसरी बुद्रुक येथील ग्राममहसूल अधिकारी रवींद्र बेंद्रे यांनी केला आहे.

# पुरंदर तालुक्यातील १८ शाळांच्या विकासासाठी कोट्यावधींचा निधी

- ग्रामीण शिक्षणाच्या दर्जात होणार मोठी वाढ
- चांबळी, नारायणपूर, सोनोरीसह 18 गावांचा समावेश
- नवीन वर्गखोल्या, दुरुस्ती व मूलभूत सुविधा उभारणार

नाझरे सुपे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद पुणे यांनी महत्वाचा निर्णय घेत 18 प्राथमिक शाळांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिल्हा नियोजन निधीतून या शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या बांधकाम, इमारत दुरुस्ती तसेच विविध मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून दुरुस्तीची प्रतीक्षा असलेल्या शाळांना दिलासा मिळणार असून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुविधायुक्त वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.




या योजनेमध्ये पुरंदर तालुक्यातील चांबळी, कोडीत खुर्द, नारायणपूर, कुंभारवळण, यादववाडी, माहूर, तोंडल, पिंपरे खुर्द, पारगाव (4 CR), दौंडज, राख, नाझरे सुपे, कदमवस्ती, पिसर्वे, राजुरी, राजेवाडी, सोनोरी आणि जगतापवस्ती या गावांतील शाळांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रस्तावाला जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. संबंधित कामे तांत्रिक मान्यतेनंतर लवकरच सुरू होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. कामांची गुणवत्ता राखण्यासाठी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते यांच्या देखरेखीखाली ही कामे केली जाणार आहेत. तसेच ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या कामांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणे सुविधा मिळणार असून शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम होणार आहे. सुरक्षित इमारती आणि चांगल्या सुविधा मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्याचीही अपेक्षा व्यक्त होत आहे.

गजानन पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे) यांनी सांगितले की, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा देणे हे आमचे प्राधान्य आहे. सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे."

संजय नाईकडे (शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद पुणे) यांनी सांगितले की, "या विकासकामांमुळे शाळांची भौतिक परिस्थिती सुधारेल आणि विद्यार्थ्यांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळेल."

या निर्णयामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून अनेकांनी जिल्हा परिषदेचे आभार मानले आहेत. लवकरात लवकर कामे सुरू व्हावीत अशी मागणी देखील करण्यात येत आहे.

पुरंदर तालुक्यातील शाळांच्या विकासासाठी मिळालेला हा निधी ग्रामीण शिक्षणासाठी महत्वाचा टप्पा मानला जात असून यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे

**कोणती कामे होणार?**

खालील कामे करण्यात येणार आहेत:
- नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम
- शाळा इमारतींची दुरुस्ती
- स्वच्छतागृह बांधकाम
- कंपाउंड वॉल
- पिण्याच्या पाण्याच्या सुविधा
- विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा
- इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा

## अहिल्यानगरमध्ये 'दुसरे बालपण' स्पर्धा २०२६

कवठे येमाई (दै. संध्या)

ज्येष्ठ नागरिकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. कांकरीयांचे मानकन्हैया ट्रस्ट यांच्या वतीने 'दुसरे बालपण स्पर्धा २०२६' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील पहिलीच अशी ही स्पर्धा असून यंदा तिचे तिसरे वर्ष साजरे होत आहे.या स्पर्धेचा मुख्य उद्देश ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या 'दुसऱ्या बालपणात' आनंद, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास देणे हा आहे. 'खास ज्येष्ठ नागरिकांसाठी कला-आनंद उत्सव' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध कला प्रकारांचा समावेश असून स्पर्धेमध्ये नाटिका, संगीत नाटिका आणि नृत्यनाटिका असे विविध सादरीकरण प्रकार ठेवण्यात आले आहेत. यावर्षीचा विषय 'विवाह सोहळा एक उत्सव' असा ठेवण्यात आला असून, सहभागी स्पर्धकांनी या विषयावर आधारित सादरीकरण करायचे आहे. स्पर्धेची तारीख व स्थळ - ही स्पर्धा बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी माजली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ४ मे २०२६ ठेवण्यात आली आहे.या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली असून स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत.सांघिक प्रथम पारितोषिक : ₹५०००/- सांघिक द्वितीय पारितोषिक : ₹३०००/-,सांघिक तृतीय पारितोषिक : ₹२०००/-, उत्तेजनार्थ पारितोषिक : ₹१०००/-

## मयूर मगन दौंडकर यांचा आम आदमी पार्टीला राजीनामा

चाकण (दै. संध्या)

आम आदमी पार्टीचे माजी युवक प्रदेशाध्यक्ष मयूर मगन दौंडकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत भारतीय जनता पार्टीमध्ये आज अधिकृत जाहीर प्रवेश केला.

मुंबई येथील भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मा. कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी पक्ष प्रवक्ते नवनाथजी बन, आमदार निरंजन डावखरे, आमदार अभिमन्यू पवार तसेच कार्यालयीन प्रभारी रवीजी अनासपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



**भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश**

मयूर मगन दौंडकर यांनी गेल्या सात वर्षांपासून आम आदमी पार्टीमध्ये सक्रिय राजकीय कार्य करत युवक संघटन उभारणी, जनआंदोलन, संघटनात्मक विस्तार तसेच विविध सामाजिक व जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केले. युवक प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यभर युवकांना संघटित करण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी संवाद साधताना मयूर मगन दौंडकर म्हणाले की, "देशहित, विकास आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी कार्य करणारी भारतीय जनता पार्टीची विचारधारा मला प्रेरणादायी वाटते. येणाऱ्या काळात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून युवकांना संघटित करणे, स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका घेणे आणि जनतेच्या विकासासाठी सातत्याने काम करण्याचा माझा संकल्प आहे."

## सोमेश्वरने नीरा प्रदूषणाचे आरोप फेटाळले

नीरा (दै. संध्या)

नीरा नदी प्रदूषणाबाबत होत असलेल्या आरोपांना श्री सोमेश्वर साखर कारखान्याच्या प्रशासनाने फेटाळून लावले आहेत. कारखान्याकडून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी किंवा केमिकलयुक्त पाणी नीरा नदीत सोडले जात नसल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे. काही व्यक्तींनी कोणताही ठोस पुरावा नसताना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पसरवून कारखान्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही दिवसापूर्वी नीरा नदीत हजारो मासे मरून पडले होते.यानंतर सोमेश्वर कारखान्याने नदीत प्रदूषित पाणी सोडल्याने हे मासे मेल्याचा आरोप स्थानिक लोकांनी केला होता.




यानंतर सोमेश्वर कारखान्याच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यात अत्याधुनिक इफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लांट (ETP) कार्यरत असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन केले जात असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकल्पात प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशा तीन टप्प्यांत सांडपाण्याची शास्त्रोक्त प्रक्रिया केली जाते. प्रक्रिया केलेले पाणी पूर्णतः सुरक्षित असून त्याचा पुनर्वापर केला जातो. 'झिरो डिस्चार्ज' संकल्पनेनुसार कारखाना कार्यरत असल्याचेही व्यवस्थापनाने स्पष्ट केले. कारखाना उत्पादनाबरोबरच पर्यावरणीय जबाबदारी जपत कारखान्याने विविध उपक्रम राबवले आहेत. राज्यात उच्चांकी गाळप व साखर रिकव्हरी साध्य करताना सभासद शेतकऱ्यांना स्पर्धात्मक व समाधानकारक दर देण्याची परंपरा कारखान्याने कायम ठेवली आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी वाघळवाडी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने सुमारे ३५ एकर क्षेत्रात 'नक्षत्र वनउद्यान' विकसित करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५५०० देशी व पर्यावरणपूरक झाडांची लागवड करण्यात आली असून, त्यापैकी २.५ एकर क्षेत्रात मियावाकी पद्धतीने घनदाट वृक्षारोपण करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील जैवविविधतेत वाढ होण्यास मदत होत असल्याचे कारखाना प्रशासनाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे. कारखाना प्रशासन प्रदूषण होऊ नये यासाठी पूर्णतः खबरदारी घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## पुण्यातील घाट, टेकड्या अन् निर्जन ठिकाणी एआय कॅमेरे

शिवाजीनगर (दै. संध्या)

पुणे शहर व परिसरातील टेकड्या, घाट, उद्याने, नदीकाठ व निर्जन भाग सुरक्षित रहावा, त्याठिकाणी कोणतेही गैर प्रकार घडू नयेत. आपत्कालीन स्थितीत सुरक्षा यंत्रणेशी तात्काळ संपर्क साधता यावा, यासह नागरिक, पर्यवरण, वन्यजीव, वन्यप्राण्याची सुरक्षा लक्षात घेऊन शहर पोलीस व महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'पुणे सीसीटीव्ही सर्व्हेलन्स व सुरक्षित शहर', योजनोअंतर्गत उच्च दर्जाचे (एआय) आधारित १७८ ठिकाणी, जवळपास सहाशे एकोणीस सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. कॅमेऱ्याच्या मध्यमातून पोलिस यंत्रणेला तपास व गैर प्रकार रोखण्यासाठी मोठी मदत होणार आहे. पुण्यातील बोपदेव घाटात ऑक्टोबर २०२४ मध्ये २१ वर्षीय तरुणीवर तिघांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एआय आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची घोषणा केली होती. त्यानंतर कॅमेरे बसवण्याचे काम सुरू झाले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार हे प्रकल्प अंमलबजावणीचे नेतृत्व करत आहेत.

# सिंधू - पार्किन्सनच्या आव्हानात उभी राहणारी महासागरासारखी आई

आई... तुझं नावच एक महासागर आहे. विशाल, शांत आणि अखंड ऊर्जा देणारे. सौ. सिंधू संजय जगताप यांचा जीवनप्रवास खरंच महासागरासारखा होता, जिथे प्रत्येक लाट प्रेम, धैर्य, समर्पण आणि प्रेरणेने भरलेली होती. चार भावंडांमध्ये धाकटी असलेली सिंधू, लहानपणापासूनच जबाबदाऱ्या स्वीकारत वाढली. भावंडांची लवकर लग्नं, घरच्या कामांची जबाबदारी, आणि लग्नानंतर सासवडमधील प्रतिष्ठित घरातील जीवनाचे आव्हान ती सर्व सहज पार पाडत गेली.

**बालपणापासून जबाबदाऱ्या स्वीकारणारी महासागर**

घराची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे अनेक जबाबदाऱ्या आईवर आल्या. सातवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या सिंधूने तीन मुलींच्या भविष्यासाठी रात्रंदिवस मेहनत केली.

आम्हा मुलींना सगळ्या चांगल्या गोष्टी देण्याचा तिने प्रयत्न केला. मग ती चांगली शाळा असो, उत्तम शिक्षण असो किंवा संस्कार असो.

**प्रेमळ आणि निस्वार्थी कुटुंबासाठी आधारस्तंभ**

आईची दिनचर्या खूप कठीण होती; रोज रांगोळी, विणकाम, सुगरणपणा, मशीनकाम, पापड-लोणची तयार करणे, घरकाम, पाहुण्यांची काळजी हे सर्व करत असताना तिचे हात थरथरत होते, शरीर थकलं, पण मनाने ती खंबीर राहिली. प्रत्येक कृतीत कुटुंबासाठी जिव्हाळा, कर्तव्यदक्षता आणि स्वाभिमान प्रकट होत असे.

आईच्या स्वभावातील विशेष गोष्ट म्हणजे निस्वार्थी दारावरून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येकाला म्हणायची. किमान चहा तरी घेऊनचं जावा. घरात कोणी आला तर आपल्या घासातील घास काढून देणे, पाहुण्यांना पोटभर खाऊ घालणे असे तिने सर्वांवर प्रेम केले.

तिच्या दारातून कोणीही कधीही विनमुख गेले नाही अशी ती अन्नपूर्णा होती. ती फक्त स्वतःच्या तीन मुलींसाठीच नाही, तर भाऊभावंड, नातेवाईक आणि इतर जवळच्या लोकांसाठीही आधारस्तंभ ठरली. तिच्या प्रेमळ स्वभावामुळे ती घराच्या पलीकडेही प्रेरणा ठरली.

**पार्किन्सनच्या आव्हानात उभी राहणारी जिद्दी**

आईला वयाच्या ४३ वर्षी पार्किन्सन झाला. त्या वेळी या आजाराची माहिती फारशी नव्हती. अनेक डॉक्टर, अनेक टेस्ट आणि २००९ मध्ये निदान निश्चित झाले.

शरीरावर आजार जडला तरी तिच्या मनाची ताकद कधीच कमी झाली नाही घरकाम, मुलींचे शिक्षण, लग्न, मुलींची बाळंतपणं आणि स्वतःची काळजी ती सर्व अचूक पार पाडत राहिली.

या काळात बाबांची साथ तिला अनमोल ठरली.

घरकामात मदत, औषधांचे वेळापत्रक सांभाळणे, मुलींशी संवाद आणि मानसिक आधार बाबांनी तिच्या प्रत्येक पावलावर साथ दिली.

आई वयाच्या ६२ वर्षी अखेरच्या श्वासापर्यंत धैर्याने, जिद्दीने आणि श्रद्धेने संघर्ष करत राहिली. तिच्या या संघर्षातून शिकतो की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मन, श्रद्धा आणि आत्म्याची ताकद अखंड राहते.

**कर्मण्येवाधिकारस्ते... आणि जिंकलेले जीवन**

गीतेत सांगितल्याप्रमाणे, " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" फळाची अपेक्षा न ठेवता फक्त निस्वार्थपणे काम करणे आणि सगळ्यांवर तितकेच ओढीने प्रेम करणे. आईला कदाचित शाब्दिक माहिती नव्हती, पण तिच्या जीवनात ते प्रकट झाले. ती नियमित आपलं कर्म चांगलं करत राहिली, फळाची अपेक्षा न करता, आणि याच कर्मयोगामुळेच तिने जीवन जिंकले.

पार्किन्सनने शरीरावर जबरदस्त आव्हान निर्माण केले तरी तिच्या मनाची, श्रद्धेची आणि आत्म्याची ताकद अखंड राहिली.

**निस्वार्थी प्रेम, अध्यात्मिक साधना आणि मुलींना संस्काराने घडवणे**

आईने तीन मुलींना आर्थिकदृष्ट्या सबल केल्यानंतरही कितीही तिला सांगितले तरी काम सोडले नाही; कारण ती खरी स्वावलंबी होती.

मुलींना संस्काराने घडवणे ही तिची खरी कामगिरी होती. प्रेम, आपुलकी, कर्तव्यदक्षता, श्रद्धा, सातत्य आणि जिद्द शिकवणे.

**पार्किन्सनच्या शेवटच्या काळातही ती म्हणायची**

"मला विसरलात तरी चालेल, पण परमपूज्य कलावती आईंना विसरू नका... आपल्याकर्ता-करविता आपले सद्गुरूच आहेत, ते सदैव आपल्या पाठीशी असतात.

आई छोटया-छोट्या गोष्टींतून आनंद घ्यायची. तिची उपासनेची वेळ तिने कधीही चुकवली नाही; मंदिरात

नियमित जाणं हे तिचं जीवनाचं महत्त्वाचं अंग होतं.

सिंधूच्या आयुष्यात अनेक लोक आले. मैत्रिणी, शेजारी, नातेवाईक, मुलींच्या सासरची आणि माहेरची माणसं आणि प्रत्येकाच्या मनात तिची चांगली आठवण आहे. कारण तिचा स्वभाव प्रेमळ, आपुलकीने भरलेला आणि प्रत्येकासाठी जिव्हाळ्याचा होता.

**स्मृतीदिन आणि अखंड प्रेरणा**

आज, आईचा १ वर्षाचा स्मृतीदिन आहे. तिच्या आठवणींना उजाळा देताना आम्ही तिच्या शिकवणुकीचा आणि संघर्षाचा आदर करतो.

आज तिच्या तिन्ही मुली स्वतःच्या पायावर ठामपणे उभ्या आहेत. त्यांच्या संसाराचा प्रवास आनंदी आणि सुरळीत सुरू आहे.

आईने दिलेल्या कष्टांची, जिद्दीची आणि स्वाभिमानाची शिदोरी घेऊन त्या आयुष्यात पुढे चालत आहेत. हेच तिच्या त्यागाचं जिवंत यश आहे.

बाबांची साथ, परमपूज्य कलावती आईंच्या शिकवणुकी आणि आईची उपासना यामुळेच हे सर्व शक्य झाले. आईसाठी मंदिरात जाऊन उपासना करणे हेच तिचं बळ होतं. शेवटच्या काळातही, जेव्हा ती दिवसात फक्त काही तास सक्रिय असायची, तरी तिची श्रद्धा आणि निष्ठा अढळ राहिली.

तिची जिद्द, श्रद्धा आणि सातत्य यामुळे ती जिंकली आणि पार्किन्सन हरला. आयुष्याच्या शेवटच्या क्षणीही सदगुरुवाचनाप्रमाणे तिने प्रार्थना केली:

"शेवट गोड करी" आणि तिचा शेवट शांत, समाधानी आणि प्रेरणादायी झाला. सिंधूंचा प्रवास हा फक्त एका व्यक्तीचा नाही, तर प्रत्येक आईसाठी, प्रत्येक घरासाठी आणि प्रत्येक संघर्ष करणाऱ्या मनासाठी प्रेरणा आहे.

तिची कथा सांगते. आजार शरीराला हरवू शकतो, पण मन, श्रद्धा आणि आत्म्याला कधीच नाही. आईचं आयुष्य म्हणजे महासागर....

जिथे प्रेम, त्याग, संघर्ष, श्रद्धा आणि सकारात्मकतेचा अखंड प्रवाह कधीच थांबत नाही...

अशी आमची आई - कुणासाठी मावशी, कुणासाठी मैत्रीण, कुणासाठी काकी, कुणासाठी सासूबाई तर कुणासाठी आज्जी; पण प्रत्येकाच्या मनात ती प्रेम, त्याग आणि कृपेची मूर्ती होती... खरी कृपासिंधू.

# प्रथिनांच्या कमतरतेमुळे कोणती लक्षणं दिसून येतात? कमतरता दूर करण्यासाठी फॉलो करा 'या' टिप्स

**शरीर योग्यरित्या कार्य करण्यासाठी पोषक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्व पोषक घटकांमध्ये प्रथिनांचा वाटा महत्त्वाचा असतो. कारण प्रथिने शरीराच्या सर्वांगीन कार्यक्षमेसाठी, स्नायूंच्या वाढीसाठी आणि पेशींच्या पुनर्रचनेसाठी खूप फायदेशीर आहे. परंतु आरोग्य तज्ञांच्या मते, जर शरीरात दीर्घकाळ प्रथिनांची कमतरता राहिली तर आरोग्यावरी गंभीर परिणाम होऊ शकतात. प्रथिनांची कमतरता लवकर ओळखणे आणि या पोषक तत्त्वाच्या कमतरतेवर उपाय करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, शरीरात प्रथिनांची कमतरता आहे हे आपण कसं ठरवावं? चला तर सर्वप्रथम प्रथिनांच्या कमतरतेदरम्यान दिसू लागणाऱ्या काही लक्षणांबद्दल समजून घेऊया....**



प्रथिनांच्या कमतरतेची लक्षणं: सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे हे प्रथिनांच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. प्रथिनांच्या कमतरतेमुळे स्नायूंची झीज देखील होऊ शकते. त्वचेचा कोरडेपणा हे देखील प्रथिनांच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. शरीरात प्रथिनांची कमतरता झाल्यास केस गळू शकतात. जेव्हा शरीरात जास्त प्रमाणात प्रथिनांची कमतरता भासते तेव्हा जखमा हळूहळू भरतात. पायांना किंवा पोटला सूज येते. वारंवार भूक लागते. तसंच वारंवार आजारी पडणे ही देखील प्रथिनांच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. प्रथिनांची कमतरता दूर करण्यासाठी आहारात प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करावा. मसूर, सोयाबीन, चिज, दही, अंडी, मोड आलेली धान्ये, बदाम, शेंगदाणे, चिया सिड्स आणि भोपळ्याच्या बियांमध्ये प्रथिनांसहित अनेक पोषक घटक लक्षणीय प्रमाणात असतात. आहारात दूध आणि सोयाचा देखील समावेश केला जाऊ शकतो. सर्वोत्तम परिणाम मिळवण्यासाठी हे सुपरफूड्स योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन करणं आवश्यक आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट: तुमच्या शरीरात प्रथिनांची तीव्र कमतरता भासल्यास आरोग्य विषयक अनेक समस्या उद्भवू शकतात. जेव्हा प्रथिनांची कमतरता गंभीर असते, तेव्हा केवळ आहारात प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करणे पुरेसे नसते. अशा परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास प्रथिने पूरक गोळ्या घेण्यास मदत होऊ शकते. प्रथिनांची ही कमतरता दूर करण्यासाठी प्रोटीन सप्लिमेंट्स प्रभावी ठरू शकतात. तज्ञांच्या मते, प्रथिनांच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या शाकाहारी लोकांसाठी क्विनोआ हा एक चांगला आहार आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासानुसार, त्यातील असंतृप्त चरबी, पोटॅशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, मॅंगनीज, तांबे, जस्त, तसेच बी-6, नियासिन, थायमिन आणि ई सारखी जीवनसत्त्वे आणि पोषक तत्वे शरीराला संपूर्ण आरोग्य प्रदान करतात. क्विनोआमध्ये फॅटी ॲसिड आणि ओमेगा-3 फॅटी ॲसिडच्या स्वरूपात शरीराला आवश्यक असलेली चरबी देखील असते, आणि फायबरने समृद्ध असलेला क्विनोआ, वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी एक चांगला आहार आहे.

तज्ञांच्या मते, ओट्समध्ये केवळ प्रथिनेच नव्हे, तर सर्व प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध असलेला 'सुपरफूड' म्हणूनही ओळखले जाते. त्यांनी स्पष्ट केले की, त्यात कर्बोदके, फायबर, तसेच मॅंगनीज, फॉस्फरस, तांबे, लोह, सेलेनियम, मॅग्नेशियम आणि जस्त यांसारखी खनिजेही भरपूर प्रमाणात असतात. ओट्स दूध, मध इत्यादींसोबत घेतल्यास शरीराला अधिक पोषक तत्वे मिळतात. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासानुसार, ओट्समध्ये प्रथिने, स्टार्च, असंतृप्त फॅटी ॲसिडस् आणि डायटरी फायबर यांसारख्या मौल्यवान पोषक तत्वांचे लक्षणीय प्रमाण असते.

सब्जा: तज्ञांच्या मते, ज्यांना वजन कमी करायचे आहे आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवायची आहे, त्यांच्यासाठी सब्जा सिड्स एक उत्तम अन्न आहे. त्यांच्या मते, यामध्ये कॅलरीज कमी असतात, प्रथिने आणि फायबर असतात, हे ग्लूटेन-मुक्त आहे, तसंच यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स असतात, जे आरोग्यासाठी खूप चांगले आहेत. या सिड्समधील उच्च फायबरच्या प्रमाणामुळे पोट बराच काळ भरलेले राहते. सहसा, सब्जा सिड्स पाण्यात भिजवून खाल्ल्या जाऊ शकतात. अन्यथा तुम्हाला सॅलड आणि स्मूदीमध्ये मिसळून त्यातील पोषक तत्वे मिळवता येतात.

# एका दिवशी किती पिस्ता खाणं योग्य; रोज पिस्ता खाल्ल्यास काय होते?

**पिस्ता फक्त खायला चविष्टच नाही, तर त्यात आरोग्याचा खजिनाही दळलेला आहे. प्रथिने, फायबर आणि आरोग्यदायी चरबीने समृद्ध असलेला पिस्ता सर्व वयोगटातील लोकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन बी 6 आणि पोटॅशियमसारखी विविध जीवनसत्त्वे आणि खनिजेही आढळतात. नुकत्यात करण्यात आलेल्या एक अभ्यासानुसार जेव्हा आपण कमी पौष्टिक पदार्थांऐवजी पिस्त्यांचे सेवन करतो, तेव्हा शरीरात अनेक बदल घडतात. या लेखात, दररोज पिस्ता खाल्ल्याने होणाऱ्या प्रत्यक्ष बदलांविषयी सविस्तरपणे जाणून घेऊया...**





संशोधक, डॉक्टर आणि आहारतज्ञ पिस्त्याला पोषक तत्वांचा खजिना मानतात, ज्यामुळे आरोग्याला प्रचंड फायदे मिळतात. त्यातील अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर त्यांना इतर सुक्या फळांपेक्षा श्रेष्ठ ठरवतात. पिस्ता हृदय, मेंदू आणि वजन कमी करण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. इतकेच नाही, तर ते तुमची दृष्टी आणि पचनक्रिया सुधारू शकतात, मधुमेह नियंत्रणात ठेवू शकतात आणि त्वचा व रोगप्रतिकारशक्ती वाढवू शकतात.

नियमितपणे पिस्ता खाल्ल्याने तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो? आहारतज्ञांच्या मते, दररोज पिस्ते खाल्ल्याने शरीराला पोषक तत्वांचा मुबलक पुरवठा होतो आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मदत होते. पिस्त्यामध्ये विविध पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असतात. प्रामुख्याने आर्जिनिन आणि इतर अमिनो ॲसिड्स, डायटरी फायबर, आवश्यक सूक्ष्म पोषक तत्वे (तांबे, व्हिटॅमिन बी६, मॅंगनीज, थायमिन, फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह आणि जस्त), प्लांट स्टेरॉल्स (स्टिग्मास्टेरॉल आणि कॅम्पस्टेरॉल), फिनोलिक संयुगे (रेझव्हेराट्रॉल आणि कॅटेचिन्स) आणि मोनोअनसॅचुरेटेड फॅटी ॲसिड्स (मुख्यतः ओलिक ॲसिड). ही पोषक तत्वे हृदयरोग, मधुमेह, अतिरिक्त वजन किंवा लठ्ठपणा, पोटाच्या समस्या आणि काही विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात.

पिस्त्यामध्ये प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. एक औंस (सुमारे मूठभर) पिस्त्यामध्ये सहा ग्रॅम प्रथिने आढळतात, त्यामुळे अधिक प्रक्रिया केलेल्या किंवा उच्च-कार्बोहायड्रेटयुक्त पर्यायांच्या तुलनेत हा एक चांगला नाश्त्याचा पर्याय ठरतो. पिस्त्यामध्ये कॅलरीज जास्त असल्या तरी, ते प्रमाणात खाल्ल्यास निरोगी वजन नियंत्रणासाठी मदत करू शकतात.

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन (2025) मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, स्नॅक्समध्ये बदल केल्याने चयापचय आरोग्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते. या अभ्यासानुसार, क्रॅकर्स, चिप्स किंवा प्रक्रिया केलेल्या पदार्थांऐवजी पिस्त्यासारखे सुकामेवा खाल्ल्याने उच्च रक्तदाब, पोटावरील चरबी आणि उच्च रक्तातील साखर यांसारख्या मेटाबॉलिक सिंड्रोमशी संबंधित समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते.

बदाम, अक्रोड किंवा काजू यांसारख्या इतर सामान्य सुकामेव्याच्या तुलनेत पिस्त्यामध्ये व्हिटॅमिन बी६ चे प्रमाण सर्वाधिक असते. व्हिटॅमिन बी-6 मध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाह-विरोधी गुणधर्म आहे. जे रोगप्रतिकारशक्ती, मेंदूचे कार्य, आकलनशक्ती आणि मनःस्थितीसाठी खूप फायदेशीर आहेत. बी-6 स्थूल पोषक घटकांच्या चयापचयात मदत करते आणि हिमोग्लोबिन, डीएनए व न्यूरोट्रान्समीटरच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. याचा अर्थ असा की, व्हिटॅमिन बी६ तुमच्या शरीराला अशी रसायने तयार करण्यास मदत करते, जी तुमच्या मेंदूला तल्लख, संतुलित आणि एकाग्र राहण्यासाठी आवश्यक असतात.

रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते: पिस्ता केवळ तुमच्या मेंदू आणि मनःस्थितीलाच आधार देत नाहीत, तर ते तुमच्या हृदयासाठी, रक्तदाबासाठी आणि कोलेस्ट्रॉलच्या पातळीसाठी देखील उत्तम आहेत. संशोधनात असंही दिसून आलं आहे की, विशेषतः रोजच्या आहारात पिस्त्यांचा समावेश केल्यास, ते रक्तदाब सुधारण्यास आणि कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करू शकतात.

झोप चांगली: पिस्त्यांमधील उच्च मेलाटोनिनच्या प्रमाणामुळे तुमची 'ब्युटी स्लीप' (शांत झोप) सुधारण्यास मदत होऊ शकते. तज्ञांच्या मते, मेलाटोनिन हे ट्रिप्टोफॅन-सेरोटोनिन मार्गाद्वारे तयार होणारे पीनियल ग्रंथीतील एक हार्मोन आहे. जे शरीराच्या झोपेच्या चक्राचे नियमन करते. तसंच रोगप्रतिकारशक्ती, प्रजनन आरोग्य आणि आतड्यांची हालचाल सुधारते. महत्त्वाचे म्हणजे, पिस्त्यांमध्ये आढळणारे व्हिटॅमिन बी६ हे ट्रिप्टोफॅनचे मेलाटोनिनमध्ये रूपांतर करण्यासाठी सह-घटक (को-फॅक्टर) म्हणून कार्य करते.

तुमच्या डोळ्यांचे आरोग्य सुधारू शकते: अनेक अभ्यास आणि संशोधनांमधून असे दिसून आले आहे की पिस्ते डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत.

पिस्ता सर्वांसाठी नाहीत: पिस्ता हे निश्चितच पोषक तत्वे, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले एक उत्तम सुकामेवा आहे. तथापि, ते प्रत्येकासाठी फायदेशीर नसतात आणि विशिष्ट आरोग्य समस्या असलेल्या लोकांनी त्यांचे सेवन टाळावे किंवा सावधगिरी बाळगावी. यामध्ये अशा कोणाचाही समावेश आहे जे...

ॲलर्जीच्या समस्या
किडनी स्टोनचे रुग्ण
वजन वाढण्याचा धोका
पचनाच्या समस्या आयबीएस
(इरिटेबल बाऊल सिंड्रोम)

तुम्ही दररोज किती पिस्ते खाऊ शकता? तज्ञांच्या मते, सध्याच्या आहारविषयक मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रौढांनी दर आठवड्याला सुमारे पाच औंस सुकामेवा खावा, किंवा 2,000 कॅलरीच्या आहारासाठी दररोज 1 औंस (49 पिस्त्याचे दाणे) खावा. कमी किंवा जास्त कॅलरीची गरज असलेल्या आहारानुसार हे प्रमाण समायोजित केले जाऊ शकते.

# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया

**दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.**



आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.

आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो.

शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संतुलित आहारच मधुमेह नियंत्रणाची गुरुकिल्ली; मधुमेह रुग्णांसाठी 'मिलेट्स' ठरतात फायदेशीर

**मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी औषधोपचारांइतकाच आहार महत्त्वाचा आहे. बदलत्या जीवनशैलीमुळं वाढणाऱ्या मधुमेहाच्या पार्श्वभूमीवर पारंपारिक भरडधान्ये किंवा तृणधान्ये (Millets) पुन्हा एकदा आहारात महत्त्वाचे ठरत आहेत. यासंदर्भात आहारतज्ञ दीपाली भैसे-वाघ यांनी मिलेट्सचा योग्य पद्धतीनं वापर केल्यास रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणं, कसं सोपं आहे.**

मिलेट्सची अशी आहे उपयुक्तता : भरडधान्ये अर्थात गहू ज्वारी, बाजरी, कोदो, कुटकी हे पूर्णतः ग्लूटेन फ्री असल्यामुळं ते पचनासाठी हलके असतात. यामध्ये तंतुमय पदार्थांचं प्रमाण खूप जास्त असल्यानं अन्न हळूहळू पचतं. ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळं रक्तातील साखर झपाट्यानं वाढत नाही. वजन नियंत्रणासाठी हे अत्यंत उपयुक्त आहे. आतड्यांचे आरोग्यदेखील यांच्यामुळं सुधारतं. कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत होते. दीर्घकाळ पोट भरल्याची भावना मिलेट्स देतात असं देखील दिपाली भैसे- वाघ यांनी सांगितलं.

रोजच्या आहारात ज्वारीची भाकर सुरक्षित : ज्वारीमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आयर्न आणि तंतुमय पदार्थ मुबलक असतात. रोजच्या आहारात ज्वारीची भाकर समाविष्ट करणं, हे अतिशय आवश्यक आहे. ज्वारीमुळं पोट भरल्याची भावना जास्त वेळ टिकते. त्यामुळं वारंवार भूक लागत नाही. सकाळच्या नाश्त्यात ज्वारीचे पदार्थ घेतल्यास दिवसभर ऊर्जा टिकते. ज्वारी पचायला हलकी असल्यामुळं दैनंदिन आहारामध्ये वापरता येते.

बाजरी खाण्याचं महत्त्व : बाजरी ही उष्ण प्रकृती असणारं धान्य आहे. बाजरी हिवाळ्यात खाणं अतिशय योग्य ठरतं. हिवाळ्यात शरीराला बाजरीमुळं उष्णता मिळते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याकरिता बाजरी अतिशय उपयुक्त धान्य आहे. शरीराची ऊर्जा टिकवून ठेवणारी बाजरीची भाकर थंडीच्या दिवसात अत्यंत फायदेशीर आहे. उन्हाळ्यात बाजरीचं सेवन मर्यादित ठेवावं. शरीरात उष्णता वाढू नये याची काळजी घेणं, अतिशय गरजेचं असंदेखील आहारतज्ञ भैसे-वाघ यांनी स्पष्ट केलंय.

मेळघाटातील कोदु कुटकीचं महत्त्व : कोलंबो आणि कुटकी हे पारंपारिक आणि नैसर्गिक भरडधान्ये आहेत. यामध्ये उच्च प्रतीचे तंतुमय पदार्थ, प्रथिने चांगले आहेत. लोह, कॅल्शियम यात मोठ्या प्रमाणात असतात. ग्लायसेमिक इंडेक्स अत्यंत कमी असल्यामुळं मधुमेहासाठी कोदो, कुटकी हे धान्य अतिशय फायदेशीर आहे. याच्या सेवनामुळं रक्तदाब स्थिर ठेवण्यास मदत होते. पचन सुधारतं. तसेच बुद्ध कोष्टता कमी होते. अमरावती जिल्ह्यात मेळघाटात आदिवासी बांधवांचं कोदो आणि कुटकी हे धान्य आरोग्यदायी आहाराचा भाग आहे, असंदेखील भैसे-वाघ म्हणाल्या आहेत.

तांदूळ पूर्णपणे बंद नको : जेवणात भात हा हवाच असतो. मधुमेह झाला आहे, म्हणून भात पूर्णपणे बंद करू नये. भात खाण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. डाळ आणि भाज्यांसोबत भात खाल्ला तर कुठलीही हरकत नाही. जंकफूड प्रोसेस फुड टाळायला हवेत. पाणी मात्र भरपूर प्यावं, असा सल्ला आहारतज्ञ दिपाली यांनी दिला. भात पूर्णपणे बंद करण्याची गरज नाही. भात खाण्याची योग्य पद्धत म्हणजे डाळीसोबत खावा म्हणजे ते प्रथिनांचं योग्य संमिश्रण होते. भातासोबत भरपूर भाज्या खाव्यात. पांढऱ्या तांदुळाऐवजी ब्राऊन राईस वापरणं चांगलं, असं दिपाली भैसे वाघ यांनी सांगितलं.

मधुमेही मुलांसाठी मिलेट्स : लहान मुलांना भाकरी खाणं आवडत नाही. असं असलं तरी त्यांना पोषक घटकांची आवश्यकता आहे. प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे ही मधुमेही बालकांना मिळायला हवेत. लहान मुलांना ज्वारी आणि बाजरीची भाकर देण्याऐवजी पराठा, चपाती आणि उपमा करून द्यावा. गोडसाठी नैसर्गिक पर्याय वापरावेत. वाढत्या वयासाठी संतुलित आहार आवश्यक आहे, असं दीपाली यांनी सांगितलं.

**दीर्घकालीन आरोग्यासाठी मिलेट्स महत्त्वाचे : मधुमेह नियंत्रणासाठी केवळ औषधोपचार महत्त्वाचे नाही, तर योग्य आहार विशेषतः भरडधान्यांचा समावेश आहारात असणं हा दीर्घकालीन आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा उपाय आहे. पारंपारिक ज्वारी, बाजरी आणि कोदो, कुटकी यासारखी धान्य पुन्हा आहारात आणल्यास केवळ साखर नियंत्रणात राहत नाही, तर एकूण आरोग्य सुधारतं. त्यामुळं आधुनिक जीवनशैलीत पारंपारिक पद्धतीकडं वळणं हीच खरी गरज आहे,**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### शिवसेनेच्या नेत्यावर विनयभंगाचा गुन्हा

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यावर आळेफाटा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये (क्र. 87/2026) विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. 2 एप्रिल रोजी दुपारी दोनच्या सुमारास एक महिला ही बांगरवाडी येथून बेल्हे येथे स्कुटीवरून जात असताना त्यांना बेल्हे बायपास रस्त्यावर एका चारचाकी वाहनाने अडवली. व त्या वाहनातून शिवसेनेचे बेल्हे येथील कार्यकर्ते आणि बेल्हे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक मोहन बाळशिराम बांगर हे उतरले. व त्या महिलेची वाद घालून त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली.तसेच गैरवर्तन देखील केले. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या महिलेने आळेफाटा पोलीस ठाणे गाठून बांगर यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. यापूर्वीही मोहन बांगर यांच्यावर एका गुन्ह्याची नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### फुलमाळी ठरला हनुमान केसरीचा मानकरी

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव येथील हनुमान जन्मोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या लाल मातीवरील कुस्त्यांच्या आखाड्यात पुणे, नगर जिल्ह्यातील160 पहिलवानांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये राहुल फुलमाळी आणि राम कांबळे यांच्यात बरोबरी झाल्यामुळे दोघेही हनुमान केसरीची मानकरी ठरले. साठ कुस्त्या निकाली झाल्या. निकाली कुस्ती करणाऱ्या पहिलवानांना 1लाख 80 हजार रुपयांचा इनाम रोख व शैलेश औटी यांच्या वतीने सलग तीन वर्ष निकाली कुस्ती करणाऱ्या पैलवानासाठी चांदीची गदा भेट देण्यात आल्याची माहिती हनुमान देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवदास तांबे यांनी दिली. यावेळी नारायणगावचे उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे, माजी उपसरपंच संतोष वाजगे, लाला बँकेचे अध्यक्ष युवराज बाणखेले, उपाध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष आबा घनवट, उपाध्यक्ष सागर पाटोळे यांच्या उपस्थितीत पैलवानांना इनाम देण्यात आला. या आखाड्यात पंच म्हणून एच पी.नरसुडे, आशिष कोल्हे,राहुल नवले, अजय कानडे,दादाभाऊ कोठाळे यांनी काम पाहिले.

### हिवरे बुद्रुकच्या पुलाला 50 कोटी रुपयांचा निधी मंजूर : अतुल बेनके



नारायणगाव (दैनिक संध्या) : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा. नितीनजी गडकरी साहेबांची जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुलशेठ बेनके यांनी दिल्ली येथे भेट घेऊन जुन्नर तालुक्यातील हिवरे बु. ते उंब्रज या पुलासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली .व या पुलासाठीनितीन गडकरी यांनी हिरवा कंदील दाखवून ५० कोटी रुपयांच्या निधीसाठी मान्यता दिली. या प्रकल्पामध्ये पुलासह दोन्ही बाजूंचे रस्ते, संरक्षण भिंत, जमीन अधिग्रहण व त्याचा मोबदला तसेच भाववाढ लक्षात घेऊन संपूर्ण ५० कोटींचा अंदाजपत्रक, नकाशे व परिपूर्ण आराखडा सादर करण्यात आला आहे.

### श्री क्षेत्र हटकेश्वर देवस्थानच्या पर्यटन विकासाला मिळाली चालना

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील मौजे गोद्रे येथील श्री क्षेत्र हटकेश्वर देवस्थानच्या पर्यटन विकासाला प्राधान्य देण्यात आले असून त्याकरिता सुमारे ८० लाख रुपयाचा निधी आमदार शरददादा सोनवणे यांनी उपलब्ध करुन दिला आहे अशी माहिती आनंदा मांडवे यांनी दिली, जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम 2025 26 अंतर्गत मौजे गोद्रे येथील श्री हटकेश्वर देवस्थान याकडे जाणाऱ्या पायवाटा विकसित करण्यासाठी 79.7 लक्ष मंजूर करण्यात आले असून त्याच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासाठी 2 /3/2026रोजी आदिवासी भागातील सामाजिक कार्यकर्ते काळुदादा शेळकंदे व ज्येष्ठ पत्रकार आनंद कांबळे यांचे माध्यमातून आपला माणूस किल्ले शिवनेरीचे शिलेदार शिवभक्त आमदार शरददादा सोनवणे यांच्याशी त्याबाबत चर्चा करण्यात आली .या प्रसंगी आनंदा मांडवे, लोकनियुक्त सरपंच सौ.अनिता कैलास रेंगडे ,कैलास रेंगडे उपस्थित होते. आमदार शरददादा सोनवणे यांनी त्याचवेळी सांगितले होते की, याच वर्षांमध्ये हटकेश्वर देवस्थानास वनपर्यटनाच्या माध्यमातून विकसित करण्यात येऊन हे तीर्थक्षेत्र भक्त भाविकांसाठी जागृत जागृत तीर्थक्षेत्र म्हणून भविष्यात विकसित करू या. आमदार शरददादा सोनवणे यांच्या सूचनेनुसार वनविभागाचे खाडे साहेब व चव्हाण साहेब यांनी आराखडा बनवला. त्यामुळे हटकेश्वर देवस्थान विकासासाठी चालना मिळाली आहे.



### सादर देखाव्यांना पुरस्कार देऊन सन्मान

पुणे (दैनिक संध्या) : श्री जैन सामुदायिक उत्सव समिति एवं सकल जैन संघ तर्फे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवात काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सुमारे १८ जैन संस्थेच्या मंडळांनी आकर्षक देखावे सादर केले. त्यात प्रथम क्रमांकाचे पुरस्कार श्री वितराग सेवा मंडल, द्वितीय पुरस्कार श्री शांतिनाथ दिगंबर सैतवाल जैन मंदिर, तृतीय पुरस्कार: श्री तुलसीबाग जैन संघ यांना देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी अचल जैन, श्री प्रकाश धारीवाल, श्री अनिल गेलडा, श्री संपत जैन, श्री समीर जैन व अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रोत्साहित रुपी सुमारे ६०० मुलांना उपहार देण्यात आले.

### तोंडल गावात श्री ज्योतिर्लिंग देवीची यात्रा उत्साहात साजरी



सातारा (दैनिक संध्या) : सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील तोंडल गावात श्री ज्योतिर्लिंग देवीची पारंपरिक यात्रा यंदा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. दिनांक १ व २ एप्रिल रोजी आयोजित या यात्रेत धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा जल्लोष पाहायला मिळाला. पंचक्रोशीतील भाविकांसाठी ही यात्रा श्रद्धा आणि उत्साहाचा सुंदर संगम ठरली. गावातील तसेच इतर जिल्ह्यांत स्थायिक झालेले तोंडलकरही मोठ्या संख्येने उपस्थित राहून नाथांच्या दरबारी हजेरी लावताना दिसले. तोंडल गावाच्या मध्यभागी असलेले श्री ज्योतिर्लिंग, कालभैरवनाथ, जोगेश्वरी देवी तसेच श्री हनुमान मंदिर हे नवसाला पावणारे देवस्थान म्हणून प्रसिद्ध असून, यात्रेच्या निमित्ताने येथे विशेष पूजा-अर्चा करण्यात आली.

# पुस्तकोपहार २०२६ : ज्ञानदानातून वृक्षसंवर्धनाचा संदेश

**केंद्रीय विद्यालय नांदेडची अभिनव पहल**




नांदेड (दै. संध्या)

पी. एम. श्री. केंद्रीय विद्यालय द. म. रे. नांदेड येथे "पुस्तकोपहार–2026" या अभिनव उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ता.27 मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमाने केवळ ज्ञानदानाचाच नाही तर पर्यावरण संवर्धनाचाही प्रभावी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली वापरून झालेली पाठ्यपुस्तके,संदर्भ पुस्तके आणि इतर उपयुक्त पुस्तके गरजू विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्याचे आव्हान करण्यात आले. "ज्ञान हेच सर्वात सुंदर उपहार" हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.विद्यालयात इयत्ता 1 ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या जुन्या पण चांगल्या स्थितीत असलेल्या पुस्तकांचे संकलन करून शिक्षकांकडे जमा केले.ही पुस्तके पुढे गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले आहेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ पुस्तकदान नसून वृक्ष संवर्धनालाही चालना देणे हा आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) च्या अहवालानुसार एक टन कागद तयार करण्यासाठी सुमारे 24 झाडे तोडावी लागतात त्यामुळे वापरलेल्या पुस्तकांचा पुनर्वापर केल्यास मोठ्या प्रमाणावर झाडांची बचत होऊ शकते.मागील वर्षी विद्यार्थ्यांनी हजारो पुस्तके दान करून शेकडो झाडे वाचवण्यास हातभार लावला होता तसे यावर्षीही या उपक्रमातून पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे.

विद्यालयाचे प्राचार्य श्री.अशोक विश्वकर्मा यांनी सांगितले की, "पुस्तकोपहार हा केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये दानशीलता, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव निर्माण करणारी एक सुंदर परंपरा आहे.प्रत्येक विद्यार्थ्याने या उपक्रमात सहभागी व्हावे."

मुख्याध्यापक श्री.राम श्रृंगारे यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की, "विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या पुस्तकांचा योग्य उपयोग करून इतरांना मदत करणे ही खऱ्या अर्थाने शिक्षणाची किमया आहे आणि यामुळे ज्ञानाची साखळी अखंडित राहते."कारण पुस्तके ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत.पुस्तकदाना मुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळते,वाचन संस्कृतीला चालना मिळते,संसाधनांचा पुनर्वापर होतो व पर्यावरण संवर्धनास हातभार लागतो.विद्यालय परिवाराने सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आव्हान केले आहे. "आपले ज्ञान इतरांसोबत वाटा,जुनी पुस्तके दान करा आणि पर्यावरणाचा मित्र बना" हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यालयाचे ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.मितेश हनवते यांनी केले व सर्व शिक्षकांच्या समन्वयाने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करून मोठ्या प्रमाणावर पुस्तक संकलन घडवून आणले. "पुस्तकोपहार– 2026" हा उपक्रम शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम ठरत असून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरत आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार, अपहरण व धमक्यांचा आरोप

- भिगवण प्रकरण हादरवणारे : चौघांवर पोक्सोअंतर्गत गुन्हा
- लग्नासाठी दबाव, व्हिडिओ काढून ब्लॅकमेल
- गोमांस खाण्यास भाग पाडल्याचाही गंभीर आरोप

भिगवण(दै. संध्या)

भिगवण येथील अल्पवयीन मुलीच्या अपहरण, लैंगिक अत्याचार आणि जबरदस्तीच्या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली असून या प्रकरणी चौघांविरुद्ध पोक्सोअंतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींनी धमकावून वारंवार अत्याचार केल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित तरुणीचे अपहरण करण्यात आले. तिचे २२ फेब्रुवारीला लग्न ठरले होते. त्यासाठी ती आई व भावासह सोने खरेदीसाठी गेली असताना झहीर हरुण शेख, आयान हरुण शेख (रा. स्वामी चिंचोली, ता. दौंड) व त्यांच्या साथीदारांनी तिला जबरदस्तीने टेम्पोत बसवण्याचा प्रयत्न केला. विरोध करणाऱ्या आईवर दांडक्याने हल्ला करून तसेच आई-भावाच्या डोळ्यात मिरचीपूड टाकून तरुणीचे अपहरण करण्यात आल्याचा आरोप आहे.

यानंतर आरोपींनी पीडितेला विविध ठिकाणी नेऊन धमकावत ठेवले. ४ एप्रिल रोजी दिलेल्या जबाबात पीडितेने सांगितले की, बारामती येथील एका हॉटेलमध्ये ती अल्पवयीन असताना तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. त्या घटनेचे फोटो व व्हिडिओ काढून नातेवाईकांना पाठवण्याची धमकी देत वारंवार अत्याचार करण्यात आल्याचे तिने नमूद केले आहे.

तसेच आरोपींनी लग्नासाठी दबाव टाकत "आम्ही स्वेच्छेने लग्न केले आहे" असे व्हिडिओमध्ये सांगण्यास भाग पाडले. स्टॅम्प पेपरवर जबरदस्तीने सह्या घेतल्या. आई व भावाला जीवे मारण्याची धमकी देऊन बारामती पोलिसांकडे खोटा जबाब देण्यास भाग पाडल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या दरम्यान पीडितेला गोमांस खाण्यास भाग पाडणे, टिकली काढणे, मानसिक व शारीरिक छळ करणे असे गंभीर प्रकार झाल्याचेही तिने सांगितले आहे. नंतर न्यायालयाच्या आदेशाने नातेवाईकांच्या ताब्यात आल्यानंतर पीडितेने संपूर्ण घटनाक्रम उघड केला.

या प्रकरणी झहीर हरुण शेख, आयान हरुण शेख, अझर शौकत शेख (रा. स्वामी चिंचोली, ता. दौंड) आणि सद्दाम शेख (रा. बारामती) यांच्याविरुद्ध भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलमे १३७(२), ३०९(४), ३(५), ६४(२), ७४, ७५(२), ३५१(२) तसेच पोक्सो कायदा २०१२ अंतर्गत कलम ४, ६, ८, १२ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून पुढील तपास भिगवण पोलीस करत आहेत.

## पुण्यात पुढील दोन दिवस तापमान राहणार स्थिर

पुणे (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून हवामानातील बदलामुळे शहरातील कमाल आणि किमान तापमानात सातत्याने चढ-उतार नोंदविण्यात येत आहे. रविवारी (ता. ५) कमाल तापमान स्थिर राहून किमान तापमानात किंचित वाढ नोंदविण्यात आली. पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. शहर आणि परिसरात रविवारी किमान तापमानात साधारण दोन अंश सेल्सिअसची वाढ होऊन ते २०.५ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले, तर कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस इतके राहिले. सकाळी आणि दुपारी उकाडा वाढला होता. पुढील दोन दिवस हवामान स्थिर असल्याने तापमानात फारसा बदल होण्याची शक्यता नाही. त्यानंतर कमाल आणि किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. पुणे आणि परिसरात सोमवारी (ता. ६) किमान तापमानात किंचित वाढ होणार असून, कमाल तापमान स्थिर राहण्याची शक्यता आहे. किमान तापमान २१ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअस नोंदविण्यात येणार आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहून दुपारी आणि सायंकाळी अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. मंगळवारपासून (ता. ७) कमाल तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता आहे.

## नास्तिक मेळाव्यातील वक्तव्यांवरून संत परंपरेचा अवमान

**आळंदी देवस्थानकडून तीव्र निषेध**

आळंदी (दै. संध्या)

नास्तिक असणे हा गुन्हा नसला, तरी स्वतःची नास्तिकता सिद्ध करण्यासाठी वारकरी संप्रदायाचे सर्वोच्च दैवत श्री विठ्ठल यांना 'कालबाह्य' म्हणणे अयोग्य असल्याचे सांगत आळंदी देवस्थानकडून डॉ. मुग्धा कर्णिक यांच्या वक्तव्यांचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. पुणे येथे २२ मार्च रोजी पार पडलेल्या 'महाराष्ट्र नास्तिक मेळावा २०२६'मध्ये डॉ. कर्णिक यांनी धर्म, पंथ व संस्कृती संदर्भात केलेली विधाने आक्षेपार्ह असल्याचे संस्थानकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, समतेचा पाया रचणारे संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा विडंबनात्मक उल्लेख करून महाराष्ट्राचे लोकदैवत श्री विठ्ठल तसेच 'वारी' परंपरेला कालबाह्य म्हणणे निषेधार्ह आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही वारकरी परंपरेचीच देणगी असून, संबंधितांनी ही बाब लक्षात घ्यावी, असेही संस्थानने स्पष्ट केले. वारकरी संप्रदायाने गेली सुमारे ७५० वर्षे समाजात समतेचा संदेश देत सर्व स्तरांतील लोकांना एकत्र ठेवण्याचे कार्य केले आहे. "या रे या रे लहान थोर, याति भलते नारीनर" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा उल्लेख करत समाज एकसंघ ठेवण्यात संत परंपरेचे योगदान अधोरेखित करण्यात आले आहे. अभ्यासाअभावी काही व्यक्ती सवंग लोकप्रियतेसाठी बेताल वक्तव्ये करीत असल्याची खंत व्यक्त करत, डॉ. मुग्धा कर्णिक यांनी आपल्या विधानाबद्दल संत परंपरा व श्री विठ्ठल यांची क्षमा मागावी, अशी अपेक्षा आळंदी देवस्थान कमिटीने व्यक्त केली आहे. आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, ॲड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या सह्यांनी हे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे.

## महावितरणकडून 'इकॅमेक्स-२०२६'मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

पुणे (दै. संध्या)

- केंद्रीय राज्यमंत्री श्री. नाईक यांनी केले कौतुक




इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इकॅम) वतीने गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इकॅमेक्स-२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महावितरणच्या प्रदर्शनीला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री मा. श्री. श्रीपाद नाईक यांनी भेट शनिवारी (दि. ४) भेट दिली व विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. गोरेगाव येथे 'इकॅमेक्स-२०२६'चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन श्री. नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा 'रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन' तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे. सौर ऊर्जेच्या योजनांद्वारे सद्यस्थितीत २० लाख ६६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरु झाला आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. नाईक यांनी प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनाला भेट दिली आणि विविध योजना, उपक्रमांची माहिती घेत कौतुक केले. त्यांचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी स्वागत केले व माहिती दिली. यावेळी विशेष कार्य अधिकारी श्री. सुधन्वा पत्की (नवी दिल्ली), इकॅमचे अध्यक्ष श्री. देवांग ठाकूर, सरचिटणीस श्री. अमरनाथ पाटील आदींची उपस्थिती होती. या तीन दिवसीय प्रदर्शनीत महावितरणचे मुख्य अभियंता श्री. पंकज तगलपल्लेवार आणि विद्युत सुरक्षा मोहिमेचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी सोमवारी (दि. ६) विशेष सत्रात विद्युत सुरक्षेबाबत प्रबोधन केले. महावितरणच्या अभियानामध्ये सहभागी होत ग्राहक संवादाद्वारे विद्युत सुरक्षेचा जागर करण्याची ग्वाही यावेळी इकॅमच्या वतीने देण्यात आली.

महावितरण प्रदर्शनीद्वारे अधीक्षक अभियंता श्री. संजय खंदारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र राठौर यांच्यासह अभियंता, अधिकाऱ्यांनी महावितरणच्या विविध योजना व विद्युत सुरक्षेसंदर्भात नागरिकांना माहिती दिली.

# सातव्या 'सिंधी प्रीमिअर लीग'ला १० एप्रिलपासून सुरुवात

## सामाजिक एकोप्याच्या भावनेतून आयोजन; सातव्या हंगामात १६ पुरुष, सात महिला संघ खेळणार

पुणे (दै. संध्या)




सामाजिक एकोप्याच्या भावनेतून आयोजित सिंधी प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेच्या सातव्या हंगामाला १० एप्रिल २०२६ पासून सुरुवात होणार आहे. यंदा या स्पर्धेत १६ पुरुष, तर सात महिला संघ सहभागी होणार आहेत. पिंपरी येथील एमसीसी, मृणाल क्रिकेट ग्राउंडवर ही स्पर्धा होणार आहे, अशी माहिती संयोजन समितीचे नरेश नशा व बिपीन दखनेजा यांनी दिली.

नरेश नशा म्हणाले, "या 'सिंधी प्रीमिअर लीग सीजन-७'चे उद्घाटन १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. यावेळी माजी क्रिकेटपटू, सिंधी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, तसेच खेळाडू, संघ मालक व कुटुंबीयांची उपस्थिती असणार आहे. सिंधी समाजातील उद्योजक तरुणांनी एकत्र येऊन गेल्या सात वर्षांपासून या क्रिकेट लीगचे आयोजन केले आहे. स्पर्धेतून उभारलेल्या निधीचा समाजासाठी उपयोग होत आहे. यंदा या स्पर्धेतून उभा राहणाऱ्या निधीतून साधू वासवानी मिशन येथील एका विद्यार्थिनीचे संपूर्ण पालकत्व स्वीकारले जाणार आहे.

बिपीन दखनेजा म्हणाले, "आयपीएलच्या धर्तीवर या स्पर्धेची रचना करण्यात आली आहे. पुरुषांचे १६ संघमालक व महिलांचे सात संघमालक आपल्या २३ संघांसह स्पर्धेत उतरणार आहेत. पुरुष संघांची नवे सिंधी संस्कृतीवर आधारित, तर महिला संघांची नावे नद्यांवर आधारित आहेत. महिलांमध्ये ९८, तर पुरुषांमध्ये २५६ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे."

या स्पर्धेतील पुरुष गटामध्ये मस्त कलंदर (गीता बिल्डर्स, मयूर तिलवानी), सुलतान ऑफ सिंध (एए प्रमोटर्स अँड बिल्डर्स, हिरानंद आसवानी), मोहेंजोदरो वॉरियर्स (मिलेनियम डेव्हलपर्स, हरीश अभिचंदानी), सिंधफूल रेंजर्स (जीएस असोसिएट्स, जितू पहलानी), एसएसडी फाल्कन (विक्रम रोहेडा फोटोग्राफी, विक्रम रोहेडा), इंडस डायनामॉस (साईबाबा सेल्स, रोहन गेहानी), दादा वासवानीज ब्रिगेड (आसवानी प्रमोटर्स अँड बिल्डर्स, श्रीचंद आसवानी), झुलेलाल सुपरकिंग्ज (गोगिया ग्रुप, सनी गोगिया), हेमू कलानी ग्लॅडिएटर्स (ट्रिओ ग्रुप, कमलेश पमनानी), गुरुनानक नाइट्स (पीव्हीआर टाईल्स वर्ल्ड, प्रकाश रामनानी), संत कंवरम रॉयल्स (विजयराज असोसिएट्स, क्रिश लाडकानी), आर्यन्स युनायटेड (आसवानी प्रमोटर्स अँड बिल्डर्स, अनिल आसवानी), जय बाबा स्ट्रायकर्स (सुखवानी असोसिएट्स, सागर सुखवानी), सिंधी इंडियन्स (मनसुखवानी असोसिएट्स, मनीष मनसुखवानी), अजराक सुपरजायंट्स (लाइफक्राफ्ट रियल्टी, हितेश दादलानी) व पिंपरी योद्धाज (कुणाल कम्युनिकेशन्स, कुणाल लखानी) अशी या संघांची नावे आहेत.

महिलांच्या संघात गंगा वॉरियर्स (दीक्षा खुबचंदानी, दीपक खुबचंदानी), गोदावरी जायंट्स (प्रेरणा गौरव रामचंदानी, जया प्रकाश रामचंदानी), झेलम क्वीन्स (शिखा व रॉकी सेवानी), सिंधू स्टारलेट्स (मनीषा अँड बिपीन दखनेजा), यमुना स्ट्रायकर्स (रिया व पवन कोटवानी), नर्मदा टायटन्स (रेशम वाधवानी व सपना मेलवानी), कृष्णा सुपरनोव्हाज (युवीना गेरेजा अँड मनीष गेरेजा) यांचा समावेश आहे.